


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०१.०८.२०२६ | अंक नं. १०५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







## भरदिवसा महिलांचे दागिने लुटीचे सत्र; २ दिवसात ४ घटना

नगर - शेतात काम करणाऱ्या, किंवा रस्त्याने चाललेल्या महिलांना मारहाण करत त्यांचे दागिने लुटण्याचे सत्र नगर तालुक्यातील सारोळा कासार व खडकी गावच्या परिसरात सुरु झाले आहे. विना क्रमांकाच्या दुचाकीवर हे अनोळखी चोरटे येतात, महिलांना मारहाण करत त्यांच्या गळ्यातील, कानातील दागिने ओरबाडतात आणि पुन्हा भरधाव वेगात निघून जातात. गेल्या २ -३ दिवसात अशा ४ घटना घडल्या आहेत. त्यामुळे या परिसरात महिलावर्गात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

१ ऑगस्ट रोजी सकाळी १० च्या सुमारास खडकी येथील रोकडे मळा परिसरात गावचे उपसरपंच नवनाथ रोकडे यांच्या पत्नी स्वाती या शेतात जनावरांना चाऱ्यासाठी कडवळ आणायला चाललेल्या असताना दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी त्यांना अडवले. त्यांना मारहाण करत त्यांच्या गळ्यातील व कानातील दागिने ओरबाडून चोरटे पसार झाले. या अचानक झालेल्या हल्लूयाने घाबरलेल्या स्वाती यांच्यावर सारोळा कासार येथे प्राथमिक उपचार करण्यात आले.

दोन दिवसांपूर्वी खडकी शिवारातच अकोळनेर-खडकी रस्त्यावर असलेल्या शेतात काम करून सायंकाळी ५.३० च्या सुमारास घराकडे परतणाऱ्या सोमनाथ नामदेव कोठुळे यांच्या आई आणि बहिण यांना तीन अनोळखी इसमांनी गाठले आणि जबरदस्तीने त्यांच्याकडील सोन्याचे दागिने हिसकावून पोबारा केला.


या लुटमारीमध्ये चोरट्यांनी १ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कुडके, ३ ग्रॅम वजनाचे टॉप्स, ४ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत आणि २ ग्रॅम वजनाची कर्णफुले असा एकूण ११ ग्रॅम वजनाचा आणि ४६ हजार रुपये किमतीचा ऐवज बळजबरीने लांबवला. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३० जुलै रोजी सायंकाळी ४.३० च्या सुमारास सारोळा कासार गावच्या रेल्वे स्टेशन परिसरात आशाबाई लिंबोरे यांना ही दुचाकीवर आलेल्या अनोळखी चोरट्यांनी रस्त्यात अडवून मारहाण करत त्यांचे दागिने लुटले होते. तर सारोळा खडकी रस्त्यावर जुना सारोळा ते पठार या दरम्यान सोनाली प्रवीण कांबळे या महिलेलाही अशाच प्रकारे मारहाण करत लुटल्याची घटना घडली होती. गेल्या २ -३ दिवसांत ४ घटना घडल्याने नागरिकांमध्ये विशेषतः महिला वर्गात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.

### युवकांनी राबविली शोध मोहीम

या घटनेची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांनी तात्काळ नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखा व नगर तालुका पोलिसांना घटनेची माहिती दिली. तसेच त्यांच्यासह गावातील अनेक युवक व ग्रामस्थांनी रोकडे मळा पासून थेट जाधववाडी पर्यंत चोरट्यांची शोध मोहीम राबविली. उपअधीक्षक वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, नगर तालुका पोलीस ठाण्याचे स.पो. नि. गणेश वारुळे यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. यावेळी कार्ले यांनी या परिसरात फिरणाऱ्या बिगर नंबरच्या दुचाकी - चार चाकी वाहनांवर पोलिसांनी धडक मोहीम राबवत कारवाई सुरु करावी अशी मागणी उपअधीक्षक वमने यांच्या कडे केली.

(छायाचित्र पान २ वर)




## ईमेल हॅक करून नगरच्या उद्योजकाची १३ लाख ५६ हजार रुपयांची फसवणूक

नगर - अहिल्यानगर शहरातील सावेडी परिसरातील व्यावसायिकाची तब्बल १३ लाख ५६ हजार ९५७ रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अनोळखी भामट्याने मोरे यांच्या कंपनीचा संगणकीय पत्ता (ई मेल) हॅक करून बनावट व्यवहार करत ही मोठी रक्कम स्वतःच्या खात्यात वळवून घेतली. या प्रकरणी नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संदीप काशिनाथ मोरे (वय ५२, रा. श्रीकृष्ण नगर, सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची पॉलिथर्म नावाची कंपनी आहे. त्यांच्या कंपनीचा अधिकृत ईमेल आयडी अनोळखी व्यक्तीने हॅक केला. त्यानंतर आरोपीने कंपनीचे हुबेहूब बनावट लेटरहेड आणि बँक तपशील बदलून बनावट धनादेश तयार केला. हा बनावट तपशील मोरे यांच्या 'सीजी पॉवर अँड सोल्यूशन्स' या ग्राहक कंपनीला ईमेलद्वारे पाठवण्यात आला. ग्राहक कंपनीने मोरे यांच्या कंपनीला द्यायचे असलेले पैसे या

(पुढील मजकूर पान २ वर)

## पती-पत्नीला मारहाण करत रोख रक्कमेसह दागिने लंपास

नगर - रात्री घरात झोपलेल्या वृद्ध दाम्पत्यास बेदम मारहाण करत ७० हजार रुपयांची रोकड व सोन्याचे दागिने तिघा चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना गुंडेगाव (ता.नगर) येथील हराळ मळा येथे १ ऑगस्ट रोजी पहाटे घडली. दत्तात्रय त्रिंबक हराळ (वय ७०) व त्यांच्या पत्नीला ही मारहाण करण्यात आली. तिघा चोरट्यांनी त्यांच्या घराचा दरवाजा वाजवला. हराळ यांनी दरवाजा उघडला असता चोरटे घरात घुसले व त्यांनी दोघांना मारहाण करत ऐवज लुटून नेला. या घटनेची माहिती मिळताच अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलिस उपअधीक्षक शिरीष वमने, सपोनि. गणेश वारुळे यांनी घटनास्थळी भेट देवून माहिती घेतली.

(छायाचित्र पान २ वर)















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## आपण निर्णय घेतो... की फक्त निवड करतो...?


राजन कुटे

आपल्या आयुष्यात आपण दररोज असंख्य निवडी करत असतो. काय खरेदी करायचे, कुठे जायचे, कोणता पर्याय स्वीकारायचा, कोणती संधी घ्यायची... अनेक गोष्टी आपण सहज ठरवत असतो. पण प्रत्येक निवड म्हणजे निर्णय असतो का?

प्रथमदर्शनी दोन्ही शब्द सारखे वाटतात. मात्र शांतपणे विचार केला, तर त्यांच्यात एक सूक्ष्म पण अत्यंत महत्त्वाचा फरक दिसतो. निवड अनेकदा सहज घडते. ती सवयीने, ओळखीने, ऐकीव माहितीवर, इतरांच्या प्रभावाने किंवा त्या क्षणी योग्य वाटलेल्या पर्यायावर आधारित असू शकते. निर्णय मात्र समजुतीतून जन्माला येतो.

त्यामागे प्रश्न असतात. विचार असतो. परिणामांची जाणीव असते. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्या परिणामांची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असते.

आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टींबाबत आपण सहज निवड करत नाही. आपण माहिती घेतो, समजून घेतो, तुलना करतो, प्रश्न विचारतो आणि मग निर्णय घेतो. मात्र आर्थिक बाबतीत चित्र अनेकदा वेगळे दिसते.

तो आपला माणूस आहे... मित्राने सांगितले आहे... सगळेच तिथे गुंतवत आहेत... आत्ताच चांगला परतावा मिळतो म्हणे... अशा अनेक कारणांमुळे आपण निवड करतो; पण त्या मागे निर्णयासाठी आवश्यक असलेला विचार, समज आणि पडताळणी नेहमीच असते असे नाही. याचा अर्थ प्रत्येक गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून राहावे, असा अजिबात नाही. पण प्रत्येक महत्त्वाच्या आर्थिक निर्णयामागे योग्य माहिती, योग्य प्रश्न आणि योग्य समज असणे आवश्यक आहे.

कारण आर्थिक निर्णयांचा परिणाम फक्त आजपुरता मर्यादित नसतो. तो आपल्या भविष्यातील जबाबदाऱ्यांना जोडलेला असतो. मुलांचे शिक्षण, निवृत्ती, आरोग्य, कुटुंबाची आर्थिक सुरक्षितता– या सर्व गोष्टींचा पाया आज घेतलेल्या निर्णयांवर उभा असतो.

अपूर्ण माहिती अनेकदा पूर्ण खात्री निर्माण करते. तर समजूतदारपणा अनेकदा योग्य प्रश्न विचारण्यापासून सुरू होतो.

काळानुसार बाजार बदलतील. उत्पादने बदलतील. पर्याय बदलतील. पण एक गोष्ट कायम राहील. निवड अनेकदा क्षणाची असते. निर्णय भविष्याचा असतो.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे,** अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०


१ ऑगस्ट रोजी सकाळी लुटमारीची घटना घडल्यानंतर खडकी ते जाधववाडी पर्यंत चोरट्यांची शोध मोहीम राबविता युवक व ग्रामस्थ.


गुंडेगाव (ता.नगर) येथे पती पत्नीला मारहाण करत चोरी केल्याच्या घटनेची माहिती घेताना अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, नगर तालुका पोलीस ठाण्याचे स.पो.नि. गणेश वारुळे आदी.

# केडगावात रात्रीच्या वेळी घर फोडून दागिने व रोकडची चोरी

**२६ ग्रॅम सोन्याचे तर ३०० ग्रॅम चांदीचे दागिने चोरट्यांनी पळविले**

नगर – केडगाव परिसरातील सचिन नगर येथे एका बंद घराचा कडीकोंडा तोडून अज्ञात चोरट्याने सोन्या–चांदीचे दागिने आणि रोख रकमेसह १ लाख ४१ हजार रुपयांचा ऐवज लांबवल्याची घटना ३१ जुलै रोजी सकाळी उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अभिजीत सुधाकर काजळे (वय ३७, रा. सचिन नगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे कुटुंबासह राहतात. त्यांच्या आईवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याने कुटुंबातील सर्व सदस्य रात्री जेवण करून वरच्या मजल्यावर झोपण्यासाठी गेले होते. त्यापूर्वी त्यांनी खालच्या खोलीला आणि मुख्य गेटला कुलूप लावले होते.

सकाळी ८ वाजेच्या सुमारास अभिजीत काजळे हे खाली आले असता, दरवाजाची कडी तुटलेली आणि कुलूप गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी आत जाऊन पाहिले असता घरातील कपाटातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तपास केला असता कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने, चांदीच्या वस्तू आणि रोख रक्कम चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. चोरीस गेलेल्या मालात १० ग्रॅमचा सोन्याचा नेकलेस, सोन्याच्या अंगठ्या, सोन्याचे डोरले, कर्णफुले असे २६ ग्रॅम सोन्याचे तर ३०० ग्रॅम चांदीचे दागिने आणि ७ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अभिजीत काजळे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून तपास स.पो.नि. कुणाल सपकाळे करत आहेत.

# नवीन बांधकामाच्या साईटवरून फर्निचर कामाच्या साहित्याची चोरी

**भोसले आखाडा परिसरातील घटना, ७७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास**

नगर – नगर शहरात चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, नुकतीच एक नवीन घटना उघडकीस आली आहे. शहरामधील फुलसौंदर मळा, भोसले आखाडा परिसरात सुरू असलेल्या एका नवीन घराच्या बांधकामाचे ठिकाण टार्गेट करून अज्ञात चोरट्यांनी फर्निचर कामाचे साहित्य चोरून नेले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत गजेंद्र रतन गिरी (वय ४२, रा. नंदनवन कॉलनी, चाणक्य चौक) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या नवीन घराचे बांधकाम फुलसौंदर मळा, भोसले आखाडा परिसरात सुरू आहे. या बांधकामावर फर्निचरचे काम चालू असल्यामुळे आवश्यक असणारे फेविकॉलचे डब्बे, अल्युमिनियम रॉड आणि इतर साहित्य त्याच ठिकाणी सुरक्षित ठेवण्यात आले होते. २९ जुलै रोजी सायंकाळी काम आटोपून मजूर व संबंधित कामगार सर्व साहित्य आतमध्ये व्यवस्थित ठेवून आणि घराला कुलूप लावून घरी गेले होते.

परंतु, दुसऱ्या दिवशी ३० जुलै रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास जेव्हा फर्निचर काम करणारे कामगार सुरजित परडीया हे नेहमीप्रमाणे बांधकाम ठिकाणी आले, तेव्हा त्यांना घराच्या दरवाजाचे शटरचे लॉक तोडलेले असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ याबाबतची माहिती घरमालक गजेंद्र गिरी यांना फोनवरून दिली. माहिती मिळताच गिरी यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पाहणी केली असता त्यांना घरातील महत्त्वाचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे समजले. चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये ५४ हजार रुपये किमतीचे हायपर कंपनीचे ४५ किलो वजनाचे फेविकॉलचे तीन डब्बे, १८ हजार रुपये किमतीचे १० अल्युमिनियम रॉड तसेच फर्निचर कामासाठी लागणारे इतर ५ हजार रुपये किमतीचे जुने व वापरते साहित्य असा एकूण ७७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी गिरी यांनी ३१ जुलै रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी बीएनएस कलम ३०५ (ए), ३३१(३) आणि ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# शहरातील रिक्षा २ ऑगस्टला ‘दुपारी चार तास बंद’ राहणार

**आ. संग्राम जगताप यांच्या सत्काराचे आयोजन**

नगर – अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटनेच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला असून, त्यानिमित्त २ ऑगस्ट रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत असे सुमारे ४ तास शहरातील ऑटो रिक्षा सेवा बंद ठेवण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

याबाबत संघटनेने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, आमदार संग्राम जगताप यांनी शहरातील विविध प्रलंबित रस्त्यांची कामे मार्गी लावत मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली आहेत. सामाजिक मंदिरे, ओपन स्पेसचा विकास, प्रोफेसर कॉलनी चौकात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याची उभारणी, तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण व स्मारक उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच शहरात दर्जेदार रस्त्यांची निर्मिती केली आहे. जुना पिंपळगाव रस्ता, तपोवन रोड आणि नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले. कोरोना काळात ऑटो रिक्षा चालकांना किराणा किटचे वाटप करून मदतही करण्यात आली. या विविध विकासकामांच्या पार्श्वभूमीवर आ. जगताप यांचा नागरी सत्कार करण्यात येणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. ही माहिती संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील आणि उपाध्यक्ष दत्ता वामन यांनी दिली.

## रामेश्वर मंदिर परिसरातून मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील डोंगरगण येथील रामेश्वर मंदिर परिसरात लावलेली बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटारसायकल (क्र.एमएच १६ एझेड ८५०७) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २५ जुलै रोजी सकाळी १० ते ११ वाजेच्या दरम्यान घडली.याबाबत आबासाहेब तुळशीराम आढाव (वय ५२, रा.आढाव वस्ती, डोंगरगण, ता. नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास स.फौ. खेडकर हे करत आहेत.

# कल्याण रोडवरील अनुसयानगर डीपी रस्त्याची दयनीय अवस्था

**काँक्रिटीकरणाच्या मागणीचे आ. जगताप यांना निवेदन**

नगर – शहरातील कल्याण रोड प्रभाग क्रमांक ९ मधील अनुसयानगर येथील डीपी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे नागरिकांना रोजच्या प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खड्ड्यांमधून मार्ग शोधताना दुचाकीचालक, पायी येणारे–जाणारे यांची त्रेधातिरपट उडत आहे.

प्रभाग क्रमांक ९ मधील अनुसयानगर येथील रस्ता हा महापालिकेच्या विकास नियोजनातील रस्ता आहे. मात्र, या रस्त्याकडे प्रशासन लक्ष देत नसल्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती व विकास व्हावा, अशी मागणी आ. संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. याबाबत अ‍ॅड. युवराज शिंदे यांनी आ. जगताप यांची भेट घेवून या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत माहिती दिली व हा रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी केली. यावेळी बोलताना अ‍ॅड. शिंदे म्हणाले, अनुसयानगर येथील डीपी रस्ता हा परिसरातील प्रमुख संपर्क मार्ग असून या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, महिला आणि वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात ये–जा असते. मात्र रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहतूक धोकादायक बनली असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल आणि पाणी साचत असल्याने दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा किरकोळ अपघातही घडत असून शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी यांना या रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. त्यामुळे या रस्त्याचे तातडीने काँक्रीटीकरण व कायमस्वरूपी विकासकाम होणे आवश्यक आहे. अनुसयानगर परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती विकसित झाल्या असून लोकसंख्याही वाढली आहे. त्यामुळे या भागातील मूलभूत सुविधांसह दर्जेदार रस्त्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे.


अनुसयानगर येथील डीपी रस्त्याचे काँक्रिटीकरण व्हावे, या मागणीचे निवेदन आ. संग्राम जगताप यांना देताना अ‍ॅड. युवराज शिंदे. समवेत शेषराव आडोळे, गणेश बेरड, राजेंद्र पाडळे.

दरम्यान नागरिकांच्या या अडचणी लक्षात घेऊन आमदार संग्राम जगताप यांनी सकारात्मक प्रतिसाद देत रस्त्याचे काम मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. आ. जगताप यांनी यापूर्वीही कल्याण रोड परिसराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. त्या माध्यमातून अनेक विकासकामे पूर्ण झाली असून परिसराचा चेहरामोहरा बदलत आहे. अनुसया नगर येथील डीपी रस्त्याचे कामही लवकरच सुरू होईल, अशी माहितीही अ‍ॅड. शिंदे यांनी दिली. यावेळी शेषराव आडोळे, गणेश बेरड, राजेंद्र पाडळे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# बी. फार्मसीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू

**विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन**

नगर – महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) यांनी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी प्रथम वर्ष बी. फार्मसी प्रवेशाची ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. विज्ञान शाखेतील पात्र विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाइन अर्ज करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करावी, असे आवाहन अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. ई–स्क्रुटिनी किंवा प्रत्यक्ष स्क्रुटिनी या दोन पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून अर्जाची पडताळणी करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर कोणताही अर्ज स्वीकारला जाणार नाही.

महत्त्वाचे वेळापत्रक प्रक्रिया – ऑनलाइन नोंदणी व अर्ज भरणे सुरू ३१ जुलै, ऑनलाइन नोंदणीची अंतिम मुदत १० ऑगस्ट (सायं. ५:०० पर्यंत) कागदपत्र पडताळणी १ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट, तात्पुरती गुणवत्ता यादी –१३ ऑगस्ट, हरकती नोंदविण्याचा कालावधी –१४ ते १७ ऑगस्ट, अंतिम गुणवत्ता यादी १९ ऑगस्ट

प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी वेळेवर अर्ज करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. गुणवत्तायादीत नाव समाविष्ट होण्यासाठी अर्जाची पडताळणी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती www.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असे प्राचार्य डॉ. बाफना यांनी सांगितले.


गर्दीत नकळत गळून पडलेले महिलेचे दोन तोळ्यांचे दागिने परत करणाऱ्या मोहन मोहन औटींच्या प्रामाणिकपणाचा गौरव करताना साई सेवा मंडळ तसेच केडगाव ग्रामस्थ.

# गर्दीत नकळत गळून पडलेले महिलेचे दोन तोळ्यांचे दागिने केले परत

**मोहन औटींच्या प्रामाणिकपणाचा साई सेवा मंडळ व केडगाव ग्रामस्थांकडून गौरव**

नगर – पैश्यापेक्षा माणुसकी आणि प्रामाणिकपणा अधिक मोठा असतो, याचा प्रत्यय केडगाव येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित महाप्रसाद सोहळ्यात आला. मोहिनी नगर येथील साई मंदिरात हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असताना एका महिलेच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण गर्दीत नकळत गळून पडले.

काही वेळाने गंठण हरवल्याचे लक्षात येताच त्या महिलेने मंदिर परिसरात शोधाशोध सुरू केली. अमूल्य दागिना हरवल्याने ती भावूक झाली होती. परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. महाप्रसाद वाटपाची सेवा बजावत असलेले साईभक्त मोहन औटी यांच्या नजरेस ते सोन्याचे गंठण पडले. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तत्काळ आयोजकांकडे जाऊन गंठण जमा केले आणि ध्वनिक्षेपकावरून ज्यांचे गंठण हरवले आहे त्यांनी ओळख पटवून ते घेऊन जावे, असे आवाहन करण्यास सांगितले.

घोषणा ऐकताच संबंधित महिला धावत आली. योग्य ओळख पटविल्यानंतर मोहन औटी यांनी तिच्या हाती सुरक्षितपणे सोन्याचे गंठण सुपूर्द केले. हरवलेली अमूल्य वस्तू परत मिळाल्याच्या आनंदाने त्या महिलेच्या डोळ्यांत अश्रू तरळले. तिने मोहन औटी यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

मोहन औटी यांच्या प्रामाणिकपणाचे साई सेवा मंडळ तसेच केडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांच्या प्रामाणिक व सेवाभावी वृत्तीचा गौरव करण्यात आला.

# अण्णाभाऊ साठे व वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे नगरमध्ये उभारणार : आ. जगताप



नगर – अहिल्यानगर शहरात महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत विकासालाही गती मिळत असल्याचे सांगत, समाजबांधवांशी चर्चा करून जागा निश्चित करण्यात येणार असून प्रशासनाची आवश्यक परवानगी व ठराव पूर्ण झाल्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे पूर्णाकृती पुतळे अहिल्यानगरात उभारण्यात येतील, अशी घोषणा आमदार संग्राम जगताप यांनी केली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर येथील अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ते बोलत होते.

आ. जगताप पुढे म्हणाले, महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या महापुरुषांनी केवळ राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य व शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची चळवळ उभी केली. त्यांनी ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांमध्ये सामाजिक जागृती निर्माण केली आणि अन्यायाविरोधात आवाज बुलंद केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी साधन असून ज्ञानाच्या बळावर व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहून समाजालाही योग्य दिशा देऊ शकते. महापुरुषांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अंकुश मोहिते यांनी आभार मानले.

## शामलाल चुग यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – गंगा उद्यान, टिव्ही सेंटर येथील रहिवासी शामलाल लालचंद चुग (न्यू सत्गुरू गारमेंटस्) (वय ७४) यांचे ३१ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रमेश चुग यांचे वडील तर अंकुश यांचे ते आजोबा होत.

## ताराबाई आहेर यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – पंचायत समिती गृहनिर्माण सोसा. रोड संजयनगर वॉर्ड नं.२ येथील रहिवासी गं.भा. ताराबाई गणपत आहेर (वय ७८) यांचे १ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १ ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ग्रामपंचायत अधिकारी अरुण आहेर यांच्या त्या मातोश्री तर राजेंद्र आहेर यांच्या चुलती, मयुर, ओमकार आहेर यांच्या आजी होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# उद्योजकाची १३ लाख ५६ हजार रुपयांची फसवणूक

**(पान १ वरुन)** नवीन बँक खात्यावर भरले. यामध्ये ९ जुलै रोजी ६ लाख ९३ हजार २२३ रुपये आणि २१ जुलै रोजी ६ लाख ६३ हजार ७३४ रुपये अशी एकूण १३ लाख ५६ हजार ९५७ रुपयांची रक्कम ट्रान्सफर करण्यात आली.

मात्र ही रक्कम मोरे यांच्या मूळ बँक खात्यात जमा न होता त्या अनोळखी व्यक्तीच्या कॅनरा बँकेच्या खात्यावर जमा झाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संदीप मोरे यांनी अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून ३१ जुलै रोजी सायबर पोलिसांनी कॅनरा बँक खाते क्रमांक ११०१८४९०११२० चा धारक आणि एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अनोळखी व्यक्तींकडून येणाऱ्या बँक बदलाच्या ईमेलची खात्री केल्याशिवाय पैसे पाठवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### जेवणाआधी काय खावे?

जेवण ही फक्त पोट भरण्याची क्रिया नाही, तर ते शरीराला ऊर्जा आणि पोषण देण्याचे साधन आहे. पण कधी आणि काय खातो यावर आरोग्य अवलंबून असते. जेवणाआधी आणि नंतर योग्य पदार्थ खाल्ल्यास पचन चांगले होते आणि आजारही दूर राहतात. जेवणाआधी २०-३० मिनिटे आधी १ ग्लास कोमट पाणी प्यावे. यामुळे पोट साफ होते आणि भूक नियंत्रणात राहते. जेवणाची सुरुवात नेहमी सॅलड, सूप किंवा फळांनी करावी. काकडी, टोमॅटो, गाजर, बीट यांचे सॅलड किंवा पपई, सफरचंद, संत्रे यांसारखे फळ पचनासाठी उपयुक्त आहेत. यामध्ये असणारे फायबर आणि पाणी अन्न लवकर पचवण्यास मदत करतात. यामुळे जास्त खाणेही टळते. जेवणाआधी लगेच थंड पाणी किंवा कोल्ड ड्रिंक पिऊ नये.जेवण झाल्यानंतर लगेच पाणी पिऊ नये, किमान ३० मिनिटे थांबावे. जेवणानंतर १० मिनिटे हळू हळू चालणे उत्तम. यामुळे शुगर लेव्हल नियंत्रणात राहते. जेवणानंतर एक वाटी दही किंवा ताक घ्यावे. यातील प्रोबायोटिक्स पचन सुधारतात. जेवणानंतर लगेच फळ खाऊ नये, १ तासाने खावे. बडीशेप, ओवा किंवा पाचक वडी घेतल्यास गॅस आणि अपचन होत नाही. जेवणानंतर लगेच झोपू नये किंवा जड व्यायाम करू नये.जेवणाआधी तळले, जास्त मसालेदार पदार्थ टाळा. जेवणानंतर लगेच चहा-कॉफी पिल्याने लोह शोषण कमी होते. थोडक्यात, जेवणाआधी शरीर तयार करा आणि जेवणानंतर शरीराला विश्रांती द्या. हा छोटा नियम पाळल्यास पचनशक्ती मजबूत होईल आणि आरोग्यही उत्तम राहील.

## पाककला

### तडका मॅगी मसाला

**साहित्य :** मॅगी नूडल्स २ पॅकेट, पाणी २ कप, कांदा १ मध्यम बारीक चिरलेला, टोमॅटो १ बारीक चिरलेला, शिमला मिरची १/२ बारीक चिरलेली, हिरवी मिरची २ बारीक चिरलेल्या, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, मॅगी मसाला २ पाकिटे, जिरे १/२ चमचा, मोहरी १/२ चमचा, हळद १/४ चमचा, लाल तिखट १/२ चमचा, चाट मसाला १/२ चमचा, मीठ चवीनुसार, तेल २ चमचे, बटर १ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** कढईत तेल गरम करा. त्यात जिरे आणि मोहरी टाका. तडतडल्यावर बारीक चिरलेला कांदा घालून गुलाबी रंगावर परतून घ्या. त्यात आलं-लसूण पेस्ट आणि हिरवी मिरची घालून १ मिनिट परता. आता बारीक चिरलेला टोमॅटो आणि शिमला मिरची घालून मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात हळद, लाल तिखट आणि मीठ घालून मिक्स करा. नंतर २ कप पाणी ओता आणि उकळी येऊ द्या. उकळत्या पाण्यात मॅगी नूडल्स आणि मॅगी मसाला घाला. ३-४ मिनिटे मध्यम आचेवर शिजवून घ्या. नूडल्स ८०% शिजले की त्यात चाट मसाला घाला. गॅस बंद करून वरून १ चमचा बटर आणि कोथिंबीर पेरा. गरमागरम तडका मॅगी सॉस आणि कांद्यासोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### केबीन कशी असावी?

✻ केबिनमध्ये बसताना पाठीमागे भक्कम भिंत असावी. पाठीमागे दार किंवा खिडकी नसावी, कारण त्यामुळे आत्मविश्वास कमी होतो.

✻ खुर्ची मोठी, हाताला आधार असलेली आणि उंच असावी.

✻ टेबल चौरस किंवा आयताकृती असावे.

✻ टेबलवर महत्वाची फाईल्स आणि लॅपटॉप ठेवा, पण मध्यभागी मोकळी जागा ठेवा.

## सौंदर्य

✻ ताजी कोरफड कापून त्यातील जेल काढा. ते थेट टाळूला लावा. २० मिनिटांनी केस धुवा. याने टाळूला ओलावा मिळतो.

✻ २ चमचे मेथी रात्री पाण्यात भिजवून सकाळी वाटून घ्या. त्याची पेस्ट कोंड्यावर लावा आणि १ तासाने धुवा. मेथीमुळे खाज कमी होते.

## सल्ला

किचन मधील चाकू धुतल्यावर लगेच कोरडा करून ठेवा. ओलसर राहिल्याने गंज येतो आणि धार जाते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६

**संकष्ट चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, पू.भा.२१।३७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ११ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात वेग राहील. आर्थिक स्थिती स्थिर राहिल.

**वृषभ :** कुटुंबात आनंदी वातावरण राहिल. जुनी गुंतवणूक फायदेशीर राहिल.

**मिथुन :** नवीन संधी मिळतील. प्रवास शक्य.

**कर्क :** मन शांत राहील. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**सिंह :** नोकरीत मान-सन्मान वाढेल. आरोग्य चांगले.

**कन्या :** मित्रांची मदत मिळेल. काम पूर्ण होतील.

**तूळ :** व्यवसायात प्रगती. भागीदारीत लाभ.

**वृश्चिक :** अडकलेले पैसे मिळण्याची शक्यता. आत्मविश्वास वाढेल.

**धनु :** शिक्षण/स्पर्धेत यश. धार्मिक कार्यात रुची वाढेल.

**मकर :** जबाबदारी वाढेल. संयम ठेवावा लागेल.

**कुंभ :** उत्पन्नाचे नवीन मार्ग सापडतील. सामाजिक संबंध सुधारतील.

**मीन :** कल्पनाशक्तीला वाव मिळेल. कला क्षेत्रासाठी चांगला दिवस. मागील उधारी वसुल होईल.

## शब्दगंध क्र. ७४८६ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | | ४ | | ५ |
| ६ | | | | ■ | | ■ | |
| ७ | | ■ | ८ | ९ | | १० | ■ |
| ■ | | ■ | ■ | | ■ | ११ | १२ |
| १३ | ■ | १४ | १५ | | ■ | १६ | |
| १७ | १८ | | | ■ | ■ | १९ | |
| ■ | २० | | ■ | २१ | २२ | ■ | |
| २३ | | | ■ | २४ | | | |

**आडवे शब्द :-** १) अंगीकारलेले व्रत ३) दुर्दैवी; कपाळकरंटा ६) अधिकाधिक पूर्णत्वाकडे जाण्याची किंवा नेण्याची क्रिया; दुरुस्ती ७) पाण्याचा बारीक प्रवाह; हत्याराची कापण्याची बाजू ८) हॉस्पिटल; रुग्णालय ११) नंतर; पुन्हा १४) शोधक; जिज्ञासू १६) दरवाजा; कवाड; द्वार १७) गहू, जव, बांबू आदींचे सत्त्व १९) मस्ती; जोर २०) नेहमी; हमेशा २१) व्यर्थ; वायफळ २३) शेपटी असणारा काळ्या तोंडाचा एक प्राणी २४) घटस्फोट; सोडचिठ्ठी; काडीमोड

**उभे शब्द :-** १) धरती; रसा; पृथ्वी; अवनी २) सामान्य; सार्वत्रिक; मध्यम ३) एक ऋषी ४) नवा; अनभ्यस्त; अनोळखी ५) बी बियाणे ९) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार १०) मंत्र्याच्या नावाअगोदर लावतात तो सन्मानदर्शक शब्द १२) अगदी गोल; वाटोळा १३) संसाराविषयी प्रेम सोडून ईश्वरचरणी लागलेली व्यक्ती १४) पाहारेकरी ; राखण करणारा १५) ओढा; रोख ; झोक १८) कपडा; कापड; वस्त्र २१) अळे; लहान खाचर २२) दोस्त ; मित्र; सखा

### शब्दगंध क्र. ७४८५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | ■ | सा | मा | न | ■ | अ | स्त |
| भा | वा | र्थ | रा | मा | य | ण | ■ |
| स | ण | क | ■ | | ■ | कु | |
| ■ | सा | ■ | | ■ | प्रा | ची | ■ |
| वि | मा | न | ■ | खा | स | दा | र |
| घ | न | ■ | रा | न | ■ | र | सा |
| ट | ■ | आ | म | दा | र | ■ | य |
| न | शी | ब | ■ | न | ■ | जी | न |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : अपयशाने खचून जाऊ नका, कारण प्रत्येक अपयश तुम्हाला यशाच्या जवळ घेऊन जातं.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### चुंबक लोखंडाला का खेचून घेतो?

लहान मुलांनो, तुम्हाला खेळायला चुंबक मिळाला आहे का? चुंबकाजवळ जर खिळा, सुई किंवा पेपरक्लिप ठेवली तर ती आपोआप धावत येऊन चुंबकाला चिकटते. हे पाहून तुम्हाला आश्चर्य वाटतं ना? पण ही काही जादू नाही. यामागे एक मजेदार विज्ञान आहे.प्रत्येक चुंबकाच्या आत एक अदृश्य शक्ती असते. आपल्याला ती दिसत नाही पण ती खूप ताकदवान असते. या शक्तीला आपण चुंबकीय शक्ती म्हणतो. ही शक्ती चुंबकाच्या सगळीकडे पसरलेली असते. म्हणूनच चुंबकापासून थोड्या लांब असलेली वस्तूही त्याच्याकडे खेचली जाते.आता प्रश्न आहे की चुंबक सगळ्याच वस्तू का खेचत नाही? कारण चुंबकाला फक्त लोखंड, पोलाद आणि निकेल सारखे धातूच आवडतात. या धातूंमध्ये खूप छोटे-छोटे कण असतात. जेव्हा चुंबक जवळ येतो तेव्हा हे सगळे कण एका रांगेत उभे राहतात आणि चुंबकाकडे धावतात. म्हणूनच खिळा आणि सुई लगेच चुंबकाला जाऊन चिकटतात. पण लाकूड, प्लास्टिक, कागद किंवा कापडामध्ये असे कण नसतात म्हणून चुंबक त्यांना खेचू शकत नाही.चुंबकाच्या दोन्ही टोकांवर सर्वात जास्त शक्ती असते. त्या भागाला आपण चुंबकाचे ध्रुव म्हणतो. म्हणूनच जर तुम्ही पेपरक्लिप चुंबकाच्या मधोमध ठेवली तर ती कमी चिकटेल, पण टोकाला ठेवली तर घट्ट चिकटेल.म्हणून लक्षात ठेवा, चुंबक आणि लोखंड यांची मैत्री खूप पक्की आहे. चुंबकाची शक्तीच लोखंडाला आपल्याकडे खेचून घेते.

### कागद


एका जंगलात एक झाड होतं. ते खूप उंच आणि हिरवं होतं. एके दिवशी काही माणसं आली आणि त्यांनी ते झाड तोडलं. झाड खूप रडलं. त्याला वाटलं आता आपलं काहीच काम नाही. नंतर त्या लाकडापासून लगदा बनवला गेला आणि त्याचे पातळ-पातळ कागद तयार झाले.

कागदाला वाटलं, आता मी फक्त फाडण्यासाठी आहे का? पण मग काय झालं? एका विद्यार्थ्याने त्या कागदावर सुंदर चित्र काढलं. दुसऱ्या कागदावर शिक्षकांनी धडा लिहिला. तिसऱ्या कागदावर आईने मुलासाठी प्रेमाचं पत्र लिहिलं.

चौथ्या कागदावर बातम्या छापल्या गेल्या आणि लोकांनी खूप ज्ञान मिळवलं. हे पाहून कागद खूप खूश झाला. त्याला समजलं की आपण झाड असताना फक्त सावली द्यायचो, पण आता कागद झाल्यावर आपण हजारो लोकांना शिकवतो, हसवतो आणि जोडतो.

बोध: आपला उपयोग कुठे आणि कसा होतो यावर आपली किंमत ठरते. कागदासारखे साधे दिसले तरी आपण दुसऱ्याच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकतो. म्हणून कागदाचा अपव्यय करू नका, त्याचा आदर करा.

## आत्मशक्ति



सत्य वागणे आम्हाला भीतीपासून मुक्त ठेवते. सत्य वागले की खोटेपणाबाबत नीती नाही, न कशात पकडले जाण्याची भीती. जो मनुष्य खोटे बोलतो, चुकीच्या करतो, दुसऱ्यांना धोके देतो त्याला कैदेची शिक्षा होते. मग पुढे तो खरे जीवन गण्याचे ठरवितो. कारण त्याला मानसिक स्वातंत्र्याची जाणीव होते.

### आत्म्याचे अस्तित्व

जो मनुष्य खूप गाने गाडी चालवितो त्याच्या मनावर नेहमी ताण असतो की आपण वाहतुकीचे यम म ोडल्यामुळे पकडले जाऊ. तो मनुष्य ( अशी वेगाने गाडी चालवितांना) निसर्ग दर्याचा आस्वाद घेऊ शकत नाही. परंतु जो योग्य गतीने गाडी चालवितो त्याला.

भ्यायचे कारण नसते. असा मनुष्य मनावर कोणताही ताण न घेता, आजूबाजूचे सौंदर्य, रेडिओवरचे संगीत वा सहप्रवाशाबरोबर गप्पागोष्टीचा मनसोक्त आनंद घेऊ शकतो.

आत्म्याचे अस्तित्त्व सत्य आहे. जर आम्ही आपल्या अंतर आत्म्याशी जोडले गेलो जो सत्य रूप आहे. तर तो आमचे जीवन चालवणारा होईल व आम्हाला भीतीपासून दूर ठेवील !

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### त्यांचे आदरातिथ्य

सुरेश ओबेरॉय : हे म्हणजे, तुम्ही मला जेवायला तर बोलावलं आणि माझं आदरातिथ्य नीट करता येईल ना असा विचार करत राहिलात, यासारखं आहे. शिवानीदीदी : बरोबर. जर तुम्ही माझ्या घरी पाहुणे म्हणून येणार असाल आणि मी अशी ऊर्जा निर्माण करत असेन तर तुम्हाला काय संदेश मिळेल ? सुरेश ओबेरॉय : न गेलेलंच बरं, असा विचार मी करेन.

शिवानीदीदी : तुम्हाला नकोसं वाटेल. मी तुमच्याबद्दल नक्की काय विचार करतीय ते तुम्हाला माहीत नसेल पण माझ्या तरंगांमुळे तुमच्या मनात जेवणाचा कार्यक्रम पुढे ढकलण्याचा विचार येईल.

जेव्हा आपल्या घरात मूल जन्माला येणार असतं तेव्हा आपला प्रत्येक विचार शुद्ध आणि शक्तिशाली असायला हवा. विचारांमध्ये काळजीची किंवा भीतीची झाक असता कामा नये. नाही तर आपण न कळत त्या आत्म्याच्या येण्याला विरोध करू. आपल्या आयुष्यात आपल्याला त्याचं स्वागत करायची इच्छा आहे पण जर आपण 'तू येण्यासाठी आमची तयारी अजून झालेली नाही' असा संदेश पाठवला तर त्या आत्म्याला तो आगंतुक असल्यासारखं वाटेल. सुरेश ओबेरॉय : असं म्हणतात की, प्रत्येक मूल स्वतःचं नशीब घेऊन येतं आणि त्याच्या पोटात जाणारा अन्नाचा प्रत्येक दाणा त्याच्यासाठी पूर्वनियोजित असतो म्हणून आपण त्याची काळजी करण्याची गरज नाही.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : अगं मी ऑफिसमधून लवकर आलोय,
आज बाहेर जेवायला जाऊ का?
बायको : हो नक्की! कुठे?
नवरा : अगं अंगणात किंवा गच्चीवर

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारताचे संविधान कोणी लिहिले?

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'बेरिजनगर – वजानगर'

एकाच गावात दोन भाग वेगळे आहेत. एक बेरिजनगर आणि दुसरे वजानगर. गावात एखाद्या घरी पाहुणा आला की त्यानं ही दोन्ही नावं ऐकली की त्याला वेगळं असं वाटायचं. नेमकी हिच नांव का दिली असतील? की ह्या गावात गणित विषयाशी संबंधित काही विशेष असेल असं मनात यायचं. बेरिजनगर आणि वजानगर येथील घरांची संख्या जवळपास सारखीच म्हणजे दोनशे-दोनशे घरांच्या आसपास. दोन्हीही नगरमध्ये प्रत्येकी एक शाळा इयत्ता दहावीपर्यंत. अकरावीपासून पुढे तालुक्याच्या ठिकाणी शिकायला जावं लागे. एकदा आम्ही मित्रमंडळाने ठरवलं की ह्या नावामागं नेमकं काय विशेष आहे हे तपासयचं, शोध घ्यायचा. तिघेजण बेरिजनगरमध्ये आणि तिघेजण वजानगरमध्ये पाहुणे म्हणून आलो. बेरिजनगर आणि वजानगर हेच नावं असण्यामागे नेमकं काय कारण आहे ह्यासाठी ज्येष्ठ नागरिकांकडे चौकशी केली. पण ते ज्येष्ठ नागरिकही समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. आता नेमकं काय करावं ह्याचा विचार हा तीन-तीन जणांचा समुह करु लागला. त्या-त्या नगरमधील शाळेम ध्ये जाऊन शिक्षकांनाही विचारले पण तेही नेमकं कारण सांगु शकले नाहीत.

आता मात्र ह्यांची उत्सुकता जास्तच ताणली गेली. हे एकुण सहाजण वेगवेगळ्या सहा घरी पाहुणे म्हणून राहिले. मग त्या घरातील प्रत्येकाच्या विचार, राहणीम ान, स्वभावाचा अभ्यास केला. साधारण आठवडाभर हे सहाहीजण राहिले. आपापल्या घरी परतले आणि एके दिवशी, त्यांच्या नेहमीच्या ठिकाणी एकत्र आले. त्या सहाहीजणांनी मला आवर्जुन बोलावले. प्रत्येकजण तेथील अनुभव सांगु लागला. बेरिजनगरमध्ये जे राहिले त्या तिघांनी त्यांचे अनुभव सांगितले त्यावरुन लक्षात आलं- बेरिजनगरमधील कुटुंबात कलकलाट, गोंगाट नव्हता. घरातल्या टीव्हीचा आवाज जेवढा पाहिजे तेवढाच. संपुर्ण कुटुंब पहाटे पाच वाजता उठणार, व्यायाम, योगसनं, प्राणायाम करणार, मॉर्निंग वॉकला जाणार. मुलं, म ुली देहधर्म उरकल्यावर गृहपाठ, अभ्यास करणार, अवांतर वाचन करणार. नोकरी-व्यवसायावाल्या व्यक्ती दिवसभरात नेमकं काय - काय करायचं आहे ह्याविषयी खिशातल्या पॉकेट डायरीत लिहिणार. शिवाय ते क्रमवार लिहून काढणार. त्यामुळे त्यांचं वेळेचं नियोजन बऱ्यापैकी अचुक असायचं. दर रविवारी बेरिजनगरमधील कुटुंबातले सगळेच सदस्य एकत्र यायचे.

आपण बेरिजनगरचा विकास करण्यासाठी काय - काय करायचं ह्याचा विचार करायचे. सुचना मांडायचे. एकमेकांच्या विचार, सुचनांचा आदर करायचे. एकंदरित बेरिजनगरमधील व्यक्ती ह्या आदर्श आचार विचारांच्या. वजानगरमध्ये जे तिघे राहिले त्यांनी जे अनुभवलं ते सांगितलं त्यावरुन लक्षात आलं की वजानगरमधील कुटुंब सुर्य उगवल्यानंतर उठायची. जर वाटलंच तर आंघोळ करायची अन्यथा हात, पाय धुवुन आपल्या उद्योगधंद्याला जायची. मुलं, मुली शाळेत जाण्याविषयी फार ओढ नसणारी. कंटाळा आला की मुलं, मुली शाळेत जायची नाहीत. पर्यायाने गृहपाठ, अभ्यास, अवांतर वाचन हा प्रकार नसायचा. कामाचं, वेळेचं नियोजन ह्या प्रकारापासुन ही कुटुंबं फार दूर होती. आला दिवस ढकलायचा एवढंच त्यांचं आवडीचंकाम. हे सगळं ऐकल्यावर आम्ही मित्रांनी विचार केला वजानगरमध्ये जे काही घडतं आहे अत्यंत चुकीचं, अधोगतीकडं नेणारं आहे. ह्यावर आपण काही करु शकतो का ? आम्ही विचार केल्यावर दोघांना सुचलं की आपण वजानगरमध्ये जाऊ. बेरिजनगरमधील कुटुंब आदर्श आचार, विचारांचे आहेत हे त्यांना सांगु. पण मला वाटलं ह्या सगळ्याचा विशेष प्रभाव पडणार नाही. मी म्हणालो - आपण दोन कुटुंब जे बेरिजनगरमध्ये राहतात, त्यांना वजानगरमध्ये घेऊन जाऊ. वजानगरमधल्या सगळ्यांना सांगु की ह्या दोन्ही कुटुंबासारखं वजानगरमधील प्रत्येकाने करायचं. जर तसं केलं नाही तर तुम्हाला बाऊंसर्स बोलावुन बदडुन काढले जाईल. खरं तर बाऊंसर्स बदडणार नाहीत पण धमकी द्यायची. बाऊंसरला फक्त तसा अभिनय करायला सांगायचं म्हणजे मारण्यासाठी हात उगारणे इत्यादि. ही माझी संकल्पना मित्रमंडळाला योग्य वाटली. आम्ही सगळेच बेरिजनगरमध्ये दहा बाऊंसर्ससह आलो जे तिघे, बेरिजनगरमध्ये राहिले होते. त्यांनी बेरिजनगरमधील सर्वांना मिटिंगकरिता बोलावले. आम्ही नेमकं कशाकरिता आलो आहोत हे सांगितलं. त्या सर्वांनाच आनंद झाला की तुमचा हा विचार नक्कीच चांगला आहे. दोन कुटुंबासह आम्ही वजानगरमध्ये आलो. बाऊंसर्सनी सर्वांना मि टिंगकरिता उचलुन आणलं. बेरिजनगर मधल्या कुटुंबांनी, वजानगरमधल्या कुटुंबांना जे जे चांगलं, सकारात्मक ते ते सांगितलं. स्वानुभव सांगितले. आपण नेमकी कोणती चुक करतो सकाळी उठल्यापासून रात्र झोपेपर्यंत, हे वजानगरमधल्या कुटुंबांच्या लक्षात आलं. ह्यापुढं आम्ही अशी चुक करणारंच नाही अशी शपथ घेऊन त्यांचा संपूर्ण दिनक्रम चांगल्या अर्थाने बदलला. आज त्या गावात वजानगर नाही. संपुर्ण गाव बेरिजनगर म्हणून पंचक्रोशीत ओळखलं जात आहे. आम्ही मित्र फक्त माध्यम झालो नकारात्मकता नष्ट करण्याचं.

(लेख क्र.६१२)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### शेवगा

१०. गर्भवती स्त्रीने शेवग्याच्या पानांचा रस अर्धा कप घेऊन तो एक ग्लास दुधामध्ये टाकून प्यायल्यास या काळात आवश्यक असणारे कॅल्शिअम, लोह, जीवनसत्त्वे हे सर्व घटक प्राप्त होऊन गर्भाशयाला बल प्राप्त होऊन बाळाची वाढ सुदृढ होते व गर्भाशयाचे आरोग्य चांगले राहून नैसर्गिक प्रसूती होण्यास मदत होते.

११. बाळंतपणानंतरही मातेने शेवग्याच्या पानांची व फुलांची भाजी नियमित खाल्ल्यास अंगावरचे दूध वाढून आई व बाळाचे आरोग्य चांगले राहते.

१२. शेवग्याचे बी डोळ्यांच्या आरोग्यासाठी उत्तम असते. या बियांचे चूर्ण अर्धा चमचा घेऊन मधात कालवून त्याचे चाटण केल्यास क्षीण झालेली डोळ्यांची शक्ती वाढते.

१३. पानांचा रस टाकून तेल सिद्ध करावे. हे तेल संधिवात, आम्लपित, मुरगळणे, अंगदुखी, गुडघेदुखी या विकारांवर वापरले असता त्वरित आराम मिळतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# युवकांनी व्यसनांपासून दूर राहून राष्ट्रनिर्मितीत सक्रिय योगदान द्यावे

### पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने, युवा शक्ती नशा मुक्त भारताची शक्ती जिल्हास्तरीय स्पर्धा संपन्न

नगर – भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत मेरा युवा भारत अहिल्यानगर आणि बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवा शक्ती नशा मुक्त भारताची शक्ती या विषयावर आधारित विविध जिल्हास्तरीय स्पर्धा सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्थेच्या सभागृहात संपन्न झाल्या.



सीएसआरडी संस्थेच्या सभागृहात आयोजित युवा शक्ती नशा मुक्त भारताची शक्ती जिल्हास्तरीय स्पर्धेत सादरीकरण करताना युवक.

युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आणि त्यांच्या सर्जनशील कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने, तसेच मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजित संतोष उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून सीएसआरडी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे हे उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. सुरेश पठारे यांनी व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीत युवकांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे नमूद केले. युवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक संवेदनशीलता आणि जबाबदार नागरिकत्व विकसित करण्यासाठी शिक्षण संस्था, शासन आणि समाज यांनी समन्वयाने कार्य करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. समाजकार्याच्या माध्यमातून युवकांना सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या सजग बनविण्यासाठी सीएसआरडी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांना स्वतःच्या क्षमता ओळखून सकारात्मक दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे व उद्घाटक पोलिस उपअधिक्षक शिरीष वमने यांनी व्यसनामुळे युवकांच्या वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर होणाऱ्या गंभीर परिणामांचा ऊहापोह केला. युवकांनी व्यसनापासून दूर राहून कायद्याचा आदर, सामाजिक मूल्यांचे जतन आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या विविध प्रश्नांचे समाधानकारक निरसन केले. राष्ट्रनिर्मितीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून कला, संस्कृती, नवोपक्रम आणि सामाजिक बांधिलकी यांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणता येते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना सत्यजित संतोष यांनी कार्यक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट करत नशा मुक्त भारत अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी युवकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. युवकांच्या सर्जनशीलतेला योग्य दिशा देण्यासाठी अशा स्पर्धा प्रभावी माध्यम ठरतात, असे त्यांनी नमूद केले.

या स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालये, शैक्षणिक संस्था आणि युवा संघटनांतील युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. समूहगीत, समूहनृत्य, पथनाट्य, चित्रकला, वादविवाद, लघुपट/रील, घोषवाक्य लेखन आणि कविता (स्लॅम पोएट्री) या स्पर्धांमधून स्पर्धकांनी व्यसनमुक्तीचा प्रभावी सामाजिक संदेश दिला.

स्पर्धांचे परीक्षण संगीत, नृत्य, साहित्य, समाजकार्य, पत्रकारिता, फोटोग्राफी, चित्रकला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञांनी केले. यामध्ये प्रसिद्ध गायिका वैदेही बल्लाळ, नृत्य प्रशिक्षक शिल्पा सूर्यवंशी, फिल्म मेकर निहाल घोडके, रील स्टार जानवी लटके, कवी दशरथ शिंदे, कवी शर्मिला गोसावी, प्रसिद्ध शिल्पकार व चित्रकार विकास कांबळे, फोटो आर्टिस्ट संदेश सूर्यवंशी, निवेदिका शिवानी शिंगवी यांनी परीक्षण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विठ्ठल पाडर व राहेल शिरसाठ यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रदीप जारे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेरा युवा भारत, अहिल्यानगरचे श्रीकृष्ण मुरकुटे तसेच सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, आसावरी झपके, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, ट्विंकल ईश्वरी, नाजीम बागवान यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी स्वयंसेवक तसेच आयोजन समितीने परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आग लागो मीपणा

संकलन: दिशान फिचर्स




तुम्हाला कुणी केला अपाय, त्यावर तुमच्याजवळ नाही उपाय. मग करणार काय? केवळ चिडून केले काही, तर लोकात झाले हसे. ते खरंच शोभून न दिसे. पण दुखावले मन स्वस्थही बसू देत नसे. काव्यशास्त्रात एक श्लोक आलाय, यस्य किंचिदपकर्तुमक्षमः कायगृहीत विग्रह निग्रहः। तददनसदृशाकृति कृति राहुरिन्दुम धुनापि बाधते।।

पुराणातली कहाणी आहे. समुद्रमंथन झाले. अमृत निघाले. विष्णूनी मोहिनीचं सुंदर रुप धारण करुन ते वाटलं. पण देवांना अमृत वाटत असता मोहिनीच्या लक्षात आलं, की एक राक्षस त्या देवांच्या रांगेत येऊन बसलाय. विष्णूनं सुदर्शन चक्र काढलं. त्या राक्षसाचं शिर धडावेगळे केलं, पण तोवर त्या राक्षसानं अमृतप्राशन केलेलं होतं. त्यामुळे त्याचं तोंड जिवंतच राहिलं. धड नसलेलं शिर. त्याला राहू हे नाव मिळालं. आपलं धड कापलं म्हणून राहूमहाराज चिडले. विष्णूवर सुड घ्यायला राहुजवळ नव्हता उपाय. विष्णू बलवान. मग राहूनं काय केलं? एक कविकल्पना आहे. की चंद्राला ग्रहण लागतं, म्हणजे राहू त्याला गिळतो, राहू हे का करतो? मोहिनीचं रुप घेतलेल्या विष्णूवर सुड उगवता आला नाही म्हणून मोहिनीच्या मुखासारखा सुंदर दिसणाऱ्या चंद्रालाच तो गिळतो व विष्णूवर सुड उगवल्याचं समाधान मानतो. पण तो स्वतः चं त्यामुळे हास्यास्पद ठरतो. म्हणून सुडाचा विचार हा हास्यास्पद प्रकार, स्वतःच स्वतःच्या प्रतिष्ठेवर केलेला वार. म्हणूनच अच्युत महाराज म्हणतात. सुडाची भावना। नपुंसो नारायणा। आग लागो मीपणा विनाशकारी।

सुडाची भावना मनात येऊ देऊ नये. केवळ अहंकार सुखवायला सुड छळतो मनाला. पण सुड घ्यायला गेलो की, तो बांधतो स्वतः ला. तो होतो कारण आपल्या विनाशाला. स्वामी समर्थ रामदासदेखील म्हणतात, तपीळपण धरु नये। सुड उगवण्या धनु नये। उडविता उडवू नये। निजस्थिती आपलु।।

तापट स्वभाव असू नये. त्यापायी सुड घ्यायला धजू नये. शांत वृत्ती ढळू देऊ नये. कुणी तुम्हाला दुखवले तरी मनाची शांती सोडू नये. आपले समाधान गमावू नये. त्याने दुसऱ्याचे काय जाते? आपलेच सुख तेवढे नष्ट पावते.

विजयाकडे मनाचा ओढा, पण कचखाऊ दुबळ्या विचारांनी घातला आहे मनाला वेढा. पण का व्हावी अशी अवस्था? संशय आणि शंका यांनी काजळली आहे. बुद्धी आणि मेधा. केवळ विचारांनी नव्हे, तर विकारांनी मन झाले द्विधा. अशावेळी आठवावा ऋग्वेदाचा मंत्र.

अभिभूर हमागमं विश्वकर्मेण धाम्ना।
आ वश्चित्तमा वो व्रत्तमा बो हं समिति ददे।

बा माणसा, टाक दुबळेपण हे हाक तुझ्या अंतरात्म्याला. जागव तुझ्या आत्मबलाला. ऐक ती तुझ्या अंतरात्म्याची हाक. तो म्हणतो आहे, आलोय मी. घबरु नकोस. दुष्ट शक्तींचा नाश करणारा बलवंत मी, आलोय कर्तुमकर्तुम सामर्थ्य माझं. मग कशाला वाहतोस हे काळजीचं दुःखाचं ओझं? तुझं चित्त आता माझ्या हाती. फोडू नको तुझ्या अपयशाचं खापर देवाच्या माथी, कारण तुच निर्माता आहेस तुझ्या देवाचा. तु. विसरलास ते? दुष्टांच्या संहाराचं व्रत घेतलं आहेत तु. व्रत पाळायला भीत आहेत तू. आता मी तेही घेतलंय माझ्या हाती. तुझी बुद्धी, मेधा, प्रतिभा, स्मृती आणि प्रकृती यांच्याशी संवाद साधणं तु केलं नाहीस का? आता तो संवादही मी करेन.

तेव्हा बा माणसा, समस्या उभी झाली. की करावे आवाहन त्या अंतरात्म्याला. तो तत्परच असतो साह्याला, तु मायेत गुंततोस. आत्मबलाला विसरतोस. दुष्टांच्या संगतीत रमतोस. दुबळा आणि नेभळट होतोस. दुष्टांचे बळ दिखाऊ असते. लोकांवर ते आपलीच गर्विष्ठ छत्री उगाच लादत असते. सोडावा दुष्टांचा संग. आठवावा मनोभंग?

सद्बुद्धी, सत्यवृत्ती आणि सत्कर्मरती, हीच अंतरात्म्याची जागृती, असा अंतरात्मा झाला जागा, की दुःखाला कुठली जागा?

एक होते छोटे गाव. त्याला लागून एक पर्वत. त्यावर खूप जंगल. वाटायची भीती गावचे लोक घाबरायचे पर्वतावर जायला. त्यात एकदा त्या पर्वतावर एक घंटा वाजू लागली. पर्वतावर आणि कर्णकर्कश घंटेचा नाद? लोक म्हणाले, एवढ्या किर्र जंगलात हा राक्षसानेच केलेला आहे. घंटानाद त्या राक्षसाचे नावही ठेवले त्यांनी घंटानाद. मग गाव भयाने पछाडले. लोक घराबाहेर पडायला भिऊ लागले.

पण त्यात एक निघाला हिमतीचा त्याने जागवले आत्मबलाला. विचारांती पटले, की कुठला राक्षस अन कुठला काय? आणि तो राक्षस खरंच असेल तर काय नुसता घंटा वाजवत बसेल? पण लोकांना ते पटेना.

मग तो लोकांना म्हणाला, मी मारतो त्या राक्षसाला. आणतो ती त्याची घणाणती घंटा. अंतरात्मा म्हणालाच त्याला. की हे नुसते भय कशाला? तो पर्वतावर गेला. जाताना एक चोर भेटला. म्हणाला, दया करा. वानरांच्या हाती पडलेली सोन्याची घंटा मिळवून द्या. मला ती पुन्हा देवळात लावायची. देवाची घंटा चोरल्यापासून माझ्यावर संकटच आली आहेत. पण ही वानरं घंटा सोडत नाहीत. अंगावर धावून येतात. घंटा त्यांनी घेतलीय. वाजवतात केव्हाही.


मग त्या हिंमतवाल्याने फुटाणे आणले. वानरांकडे फेकले. फुटाणे पर्वतभर पसरले. वानरं घंटा सोडून फुटाण्यांकडे वळली. घंटा हिमतवाल्याने उचलली. गावात आणली. देवळात घंटा बसविली.

– **किशोर गांधी**

# प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकी हिच टाटांची ओळख

### प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे, जेआरडी टाटांच्या जयंतीनिमित्त न्यू आर्ट्सच्या बीबीए विभागाचा विशेष उपक्रम

नगर – येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेजमधील बी.बी.ए. आणि बी.बी.ए.आय.बी. विभागाच्या वतीने भारतरत्न जे.आर.डी. टाटा यांची १२२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांची आणि प्राध्यापकांची मोठी उपस्थिती होती.



न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेजमधील बी.बी.ए. आणि बी.बी.ए.आय.बी. विभागाच्या वतीने भारतरत्न जे.आर.डी.टाटा यांची जयंतीनिमित्त बोलताना प्राचार्य बाळासाहेब सागडे. समवेत प्रा. वाघमारे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी आजच्या तरुण पिढीला यशस्वी उद्योजक होण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये, नवसंशोधन (नावीन्यपूर्ण विचार), नेतृत्वगुण आणि मुख्य म्हणजे अपयशातून शिकण्याची वृत्ती याविषयी बहुमूल्य मार्गदर्शन केले. जे.आर.डी. टाटा यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, उद्योगजगतातील योगदान, त्यांची सामाजिक बांधिलकी आणि प्रामाणिकपणा आजच्या तरुण स्टार्टअप्ससाठी आदर्श मार्गदर्शक आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. वक्तशीरपणा आणि गुणवत्तेच्या जोरावर यशाचा ताळमेळ साधता येतो, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख प्रा. डॉ. मंगेश वाघमारे यांनी भारतीय उद्योगाचे जनक जमशेदजी टाटा, भारतरत्न जे.आर.डी. टाटा आणि श्री. रतन टाटा यांच्या जीवनकार्याचा आणि मूल्यांचा संक्षिप्त आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी या महान विभूतींच्या आदर्शांचा स्वीकार करून उद्योजकतेकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे, असे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन डॉ. रूपाली मिस्कीन यांनी केले, तर पाहुण्यांचे स्वागत व परिचय प्रा. शामल जाधव यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. नम्रता ठाकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी प्रा. डॉ. राहुल थोरात, प्रा. डॉ. अभिजीत सातभाई, प्रा. डॉ. अनिता पेटकर, डॉ.अस्मिता जैन, प्रा. वैभव लोंढे आणि प्रा. ओंकार आव्हाड यांच्यासह दोन्ही विभागांतील विद्यार्थी उपस्थित होते.

जेआरडी टाटांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त न्यू आर्ट्सच्या बीबीएच्या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे समवेत विभाग प्रमुख प्रा.डॉ. मंगेश वाघमारे.

# राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणाच्या अशासकीय सदस्यपदी डॉ. किरण चव्हाण



नगर – मानसिक आरोग्य क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून भरीव कार्य करणारे सावेडी येथील डॉ. किरण प्रकाश चव्हाण यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरणावर मानसिक आजार असलेल्या व्यक्तींची काळजी घेणाऱ्या व्यक्ती/ संस्थांच्या प्रतिनिधी म्हणून अशासकीय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली.

मानसिक आरोग्य काळजी अधिनियम, २०१७ मधील कलम ४६(१)(I) अंतर्गत ही नियुक्ती तीन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या २४ जुलै रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ती जाहीर करण्यात आली आहे.

डॉ. किरण चव्हाण हे मनोब्रह्म फाउंडेशनचे संस्थापक, संवाद रिहॅबिलिटेशन सेंटरचे संचालक तसेच मानसिक आरोग्य तज्ज्ञ व सार्वजनिक आरोग्य विशेषज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या कार्यकाळात खालील क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात प्रभावी प्रबोधन आणि उपचार. मानसिक आजारांनी ग्रस्त व्यक्ती तसेच बेघर मनोरुग्णांचे यशस्वी पुनर्वसन. समाजात मानसिक आरोग्याविषयी पसरलेला गैरसमज दूर करण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम.समुदायाधारित मानसिक आरोग्य सेवांच्या माध्यमातून गरजूंपर्यंत पोहोचण्याचे कार्य.

राज्य मानसिक आरोग्य प्राधिकरण हे महाराष्ट्रातील मानसिक आरोग्य सेवांचे नियोजन, गुणवत्ता नियंत्रण, देखरेख, मानसिक आरोग्य कायद्याची प्रभावी अंमलबजावणी तसेच मानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कार्य करणारे सर्वोच्च वैधानिक प्राधिकरण आहे.

# रक्तदान शिबीर आयोजित करत गुरुपौर्णिमा साजरी

### विहिंपचे मंदिर अर्चक, पुरोहित आयाम व श्री दत्त संन्यासी आश्रमचा उपक्रम

नगर – गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः या श्लोकाप्रमाणे गुरु हे सर्वश्रेष्ठ आहेत. भारतीय संस्कृतीत गुरु शिष्य परंपरेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. पूर्वी भारतामध्ये गुरुकुल पद्धतीचे शिक्षण दिले जात होते. गुरु केवळ ज्ञान देत नाही तर चारित्र, शिस्त आणि संस्कारही देतात. गुरु शिष्य परंपरेत गुरु द्रोणाचार्य यांचे शिष्य एकलव्य, अर्जुन तसेच वारकरी संप्रदायात एकनाथ महाराजांनी संत तुकाराम महाराज यांना गुरु मानले होते. भारतीय संस्कृतीला लाभलेली गुरु शिष्य ही महान परंपरा आहे.


वडगाव गुप्ता, शेंडी बायपास रोड येथील श्री दत्त संन्यासी आश्रम व विश्व हिंदू परिषदेचे मंदिर,अर्चक,पुरोहित आयामाचे वतीने गुरुपौर्णिमे निमित्त घेण्यात आलेले रक्तदान शिबिर.

गुरुपौर्णिमे निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करुन पुण्य कर्मच केले आहे.असे निरुपण श्री दत्त संन्याशी आश्रमाच्या अध्यक्षा महंत चैतन्य नर्मदा माताजी यांनी केले आहे.

वडगाव गुप्ता, शेंडी बायपास रोड येथील श्री दत्त संन्यासी आश्रम व विश्व हिंदू परिषदेचे मंदिर, अर्चक, पुरोहित आयामाचे वतीने गुरुपौर्णिमा निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी श्री दत्त संन्यासी आश्रमाच्या अध्यक्षा महंत चैतन्य नर्मदा माताजी यांनी गुरुपौर्णिमेचे महत्व विशद केले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर, अर्चक, पुरोहित आयामाचे प्रांत टोळी सदस्य ॲड. जयदिप देशपांडे, विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे, जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, नगर शहरातील प्रसिध्द पुरोहित पंढरपूरकर गुरुजी व त्यांचे शिष्यगण उपस्थित होते. तसेच लक्ष्मणराव हरीशचंद्रे, चैतन्य चांदणे, ओम नांदापूरकर, अरुण खिची, सुरेंद्र आढाव ऋषिकेश हरिश्चंद्रे, डॉ. गडगे आदी उपस्थित होते.

गजेंद्र सोनवणे म्हणाले, मंदिरे ही शक्ती केंद्रे आहेत.धार्मिक कार्यांबरोबरच रक्तदानाचे सामाजिक कार्य केल्याने अनेकांचे प्राण वाचतील. श्रीदत्त संन्यासी आश्रमाने रक्तदानाच्या कार्यातून महान सेवा कार्य केले आहे. येथील भाविकांनी रक्तदान करून गुरुपौर्णिमा साजरी केली आहे.

रक्त संकलनाचे कार्य जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ. ईटकर, जनसंपर्क अधिकारी सोनाली खंडारे, प्रीती चिपाडे, गीता गाडेकर, अविनाश कदम, किशोर यादव आदींनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंदिरातील युवा सेवेकरी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित भाविकांचे श्रीकांत नांदापुरकर यांनी आभार मानले.

# कसोटी कर्णधार म्हणून ‘अजिंक्य’ तारा : जिल्ह्याचा सुपुत्र अजिंक्य राहणे



चंदनापुरी संगमनेरच्या ग्रामीण भागातून एक खेळाडू सातत्यपूर्ण सराव करीत हळूहळू भारतीय क्रिकेट संघात येतो आणि आपल्या शांत, लाघवी स्वभावाने, शैलीदार फलंदाजीने, कल्पक कसोटी क्रिकेट नेतृत्वाने लाखो क्रिकेट प्रेमींच्या हृदयात स्थान मिळवतो. तो आपल्या जिल्ह्याचा सुपुत्र म्हणजे अजिंक्य राहणे.

गुरुवारी सोशल मिडीयावर त्याने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतांना डोळ्यांतल्या भावनांनी जे सांगितले त्याने केवळ क्रिकेट रसिकांचाच नाही तर अनेकांनाही गलबलून झाले.

’फलंदाजी’ प्रमाणे आयुष्यातही टायमिंग महत्वाचे’, असे सांगत अत्यंत शालीनतेने त्याने आपली कारकिर्द थांबवली. दुःख वाटत असले तरी त्याने सन्मानाने, स्वतः निवृत्ती जाहीर केली. पण आतून एक विचार प्रकर्षाने जाणवतो. त्याच्या गुणवत्तेइतकी किर्ती त्याला मिळाली का? मुंबई सोडून महाराष्ट्राच्या इतर क्रिकेटर्सना तो मान सन्मानाचा निकष किंवा संघात स्थान मिळते का? येथील क्रिकेट पुर्वीच्या तुलनेत मागे पडतंय का?

आजकालच्या नवनव्या क्रिकेटपटूंच्या प्रसिद्धीच्या ढोलताशांसम गजरात अजिंक्यसारख्या सतारीसम क्लासिककडे दुर्लक्ष झाल्याची खंत वाटते.

शिर्षकात म्हटल्याप्रमाणे मधल्या फळीतल्या या आश्वासक, शैलीदार फलंदाजाने ६ कसोटीत कर्णधारपदाचे नेतृत्व करताना एकही कसोटी गमावली नाही. उलट ऑस्ट्रेलिया दौऱ्यात (२०२०–२१) पहिल्या कसोटीत सर्व बाद ३६ अशा अवस्थेतून, नियमित कर्णधार विराट कोहली बाहेर पडल्यानंतरही भारताला त्या मालिकेत ऐतिहासिक २–१ फरकाने विजय मिळवून दिला. पण ही सुद्धा खूप मोठी खंत वाटते की या अभूतपूर्व विजयाची पाहिजे तेवढी चर्चा ना माध्यमात झाली ना आपल्या राज्यात...या खेळातला ‘स्टारपणा’ त्याच्या वाटेला नाही आला.

मधुबालाच्या सौंदर्यातली नजाकत, अटलजींच्या वक्तृत्वातलं कवित्त्व जितकं भावतं ना, तितकीच मनमोहकता होती अजिंक्यच्या फलंदाजीत.

त्याचे श्रेष्ठत्त्व सांगताना कर्नल दिलीप वेंगसरकरांप्रमाणे त्यानेही क्रिकेटच्या पंढरी लॉर्डस्वर २०१४ मध्ये शानदार शतक झळकावल्याने तेव्हा भारताला तेथे २८ वर्षांनंतर विजय मिळवता आला होत.

परदेशी खेळपट्ट्यांवर त्याची बॅट विशेष चमकली. कारकिर्दीत झळकावलेल्या एकूण १२ शतकांपैकी तब्बल ८ भारताबाहेर आहेत. तेथील वेगवान खेळपट्ट्यांवर फलंदाजाचा खरा कस लागतो. ८५ कसोटी, ९० एकदिवसीय, २० टी २० सामनेही त्याची देशासाठी कारकिर्द. आयपीएल मध्ये सुद्धा चेन्नई विजयी संघात तो होता. कलकत्त्याचा तो कर्णधार आहे. सध्या तो इंग्लंडच्या ‘द हंड्रेड’ स्पर्धांसाठी समालोचनाची भूमीका करतोय. अर्थातच निवतृत्तीनंतर क्रिकेटशीच निगडीत राहून तो विविध प्रकाराने जोडलेला असेल यात शंका नाही.

फलंदाजीत संघाचा संकटमोचक ठरलेल्या अजिंक्यने निवृत्तीचेही योग्य ’टायमिंग’ साधताना आपल्या संदेशात सांगितले, ‘प्रारंभ असलेल्या प्रत्येक गोष्टीला अंत असतो हेच जीवनाचे सत्य आहे. वेळ आल्यावर तुम्हाला त्याचा आदर करुन पुढे जावे लागते. केवळ सरावासाठी प्रवास करणाऱ्या मुलापासून ते भारतीय कॅप घालण्याचे स्वप्न पूर्ण करण्यापर्यंत मी या खेळाला माझे सर्वस्व दिले.

‘अजिंक्यचा अर्थ ज्याला कोणी हरवू शकत नाही. पण अनेकदा पराभव पाहिला. अधिक वेळा अपयशी झालो. माझे संघ हरले, माझ्याकडून चुका झाल्या. पण एक जागा अशी आहे जिथे मी कधीच हरलो नाही. ती म्हणजे तुमची मने!’

‘कॅप नंबर २७८’ चा अजिंक्य प्रवास थांबला. त्याला क्रिकेट रसिकांकडून शुभेच्छा देतानाच त्याच्या अनुभवाचा फायदा महाराष्ट्र क्रिकेटने घ्यावा अशी अपेक्षा ठेवू या. पुन्हा एकदा आपल्या भूमीपुत्राला निखळ क्रिकेटानंद दिल्याबद्दल एक क्रिकेट खेळाडू म्हणून मनापासून सलाम ! अजिंक्यच्या वडिलानी त्याला लिहिलेले भावनिक पत्रही लक्षणिय आहे. – **किशोर गांधी (माजी क्रिकेटपटू, दिशान फिचर्स)**

# गुरुपौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण करत ‘पर्यावरण संवर्धनाचा’ दिला संदेश

नगर – गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण करणे, वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून देणे आणि हरित भविष्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.


गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत निमगाव वाघा (ता. नगर) येथील नवनाथ विद्यालयात वृक्षारोपण करताना सुमन कुरेल. समवेत मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, ग्रामपंचायत सदस्य पै.नाना डोंगरे आदी.

नवनाथ विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव सुमन कुरेल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, आप्पासाहेब कदम, तेजस केदारी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सुमन कुरेल म्हणाल्या की, गुरुपौर्णिमा हा आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या दिवशी वृक्षारोपण करून निसर्गाप्रती आपली जबाबदारी पार पाडणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. पर्यावरणाचे संरक्षण केल्याशिवाय भावी पिढीचे सुरक्षित भविष्य घडू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

पै. नाना डोंगरे म्हणाले, वृक्ष हेच जीवनाचे खरे आधार आहेत. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि कमी होत जाणारी हरित संपदा लक्षात घेता वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनालाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेमाची भावना रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून, प्रत्येकाने लावलेले झाड जगविण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना परिसर हिरवागार करण्यासाठी नियमित वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करण्याची प्रतिज्ञा देण्यात आली.

# ऑनलाइन प्रॉपर्टी शोधताना 'या' चुका टाळा!

## घर शोधा स्मार्टपणे, फसवणूक टाळा खात्रीने! भाग - २

मागील भागात घर खरेदीपूर्वी RERA पडताळणी आणि इतर महत्त्वाच्या बाबी जाणून घेतल्या. आता पुढे सुरक्षित ऑनलाइन व्यवहारासाठी आवश्यक खबरदारी आणि कागदपत्रांच्या पडताळणीविषयी सविस्तर माहिती पाहूया.

**✻ घर खरेदीपूर्वी RERA पडताळणी का आवश्यक आहे?**

ऑनलाइन जाहिराती, आकर्षक ब्रोशर किंवा एजंटची माहिती यावर विसंबून घर खरेदीचा निर्णय घेणे धोकादायक ठरू शकते. प्रकल्पाची कायदेशीर स्थिती जाणून घेण्यासाठी बिल्डरने दिलेला रेरा क्रमांक सरकारच्या maharera.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर टाकून तपासा. हा सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे.

RERA नोंदणीमुळे प्रकल्प मंजूर आहे का, त्याचा विकासक कोण आहे, बांधकामाची सद्यस्थिती काय आहे, अपेक्षित ताबा कधी दिला जाणार आहे, तसेच प्रकल्पावर कोणतेही आदेश किंवा तक्रारी प्रलंबित आहेत का, याची अधिकृत माहिती मिळू शकते. त्यामुळे केवळ जाहिरातींवर नव्हे तर अधिकृत नोंदींवर आधारित निर्णय घेणे अधिक सुरक्षित ठरते.

**✻ MahaRERA मधील काही महत्त्वाचे तत्त्वे – प्रत्येक घर खरेदीदाराने जाणून घ्यावी.**

(**टीप :** ही कायदेशीर तत्त्वे सामान्य माहिती म्हणून दिली असून, विशिष्ट प्रकरणात कायदेशीर सल्ला घेणे आवश्यक आहे.)

**१. जाहिरात आणि प्रत्यक्ष प्रकल्पात तफावत असू नये :** बिल्डरने जाहिरातीत दिलेल्या सुविधा, आराखडा किंवा आश्वासने योग्य कारणाशिवाय बदलता येत नाहीत.

**२. वेळेत ताबा देणे ही विकासकाची जबाबदारी :** विलंब झाल्यास, लागू कायद्यानुसार खरेदीदाराला व्याज किंवा अन्य दिलासा मिळू शकतो.

**३. RERA नोंदणी नसलेल्या प्रकल्पांबाबत अधिक सावधगिरी :** नोंदणी आवश्यक असलेल्या प्रकल्पाची ठएठ स्थिती तपासणे हे खरेदीदाराचे पहिले कर्तव्य आहे.

**४. करारातील अटी काळजीपूर्वक वाचा :** greement for Sale मधील प्रत्येक अट समजून घेऊनच स्वाक्षरी करा.

**५. तक्रार करण्याचा अधिकार :** विकासकाने कायदेशीर किंवा करारातील जबाबदाऱ्या पूर्ण केल्या नाहीत, असे वाटल्यास संबंधित प्राधिकरणाकडे तक्रार करण्याचा पर्याय उपलब्ध असतो.

**✻ कागदपत्रांची पडताळणी – घाईपेक्षा खात्री महत्त्वाची**

घर पाहून पसंती झाली म्हणजे व्यवहार पूर्ण झाला असे समजू नका. कोणतीही रक्कम भरण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रांची स्वतंत्र पडताळणी करणे अत्यावश्यक आहे.

विशेषतः खालील बाबींकडे लक्ष द्या–

✻ मालकी हक्क स्पष्ट आहे का?

✻ मंजूर बांधकाम आराखडा उपलब्ध आहे का?

✻ आवश्यक बांधकाम परवानग्या मिळाल्या आहेत का?

✻ ताबा देण्यासंबंधी अधिकृत कागदपत्रे उपलब्ध आहेत का?

✻ प्रकल्पाविरुद्ध न्यायालयीन वाद किंवा शासकीय कारवाई सुरू नाही ना?

या पडताळणीसाठी अनुभवी वकील किंवा तज्ज्ञाचा सल्ला घेणे हा खर्च नसून भविष्यातील मोठ्या नुकसानापासून मिळणारा विमाच आहे.

**✻ ऑनलाइन पेमेंट करताना 'ही' काळजी घ्या**

डिजिटल व्यवहारामुळे पैसे पाठविणे सोपे झाले असले तरी फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत.

काही जण आजच टोकन भरा, बुकिंग संपत आहे, ऑफर फक्त काही तासांसाठी आहे असे सांगून तातडीचे वातावरण तयार करतात. अशा वेळी भावनेपेक्षा विवेकाने निर्णय घ्या.

**ऑनलाइन पेमेंट करताना पुढील नियम लक्षात ठेवा–**

✻ कंपनीच्या अधिकृत बँक खात्यातच रक्कम जमा करा.

✻ वैयक्तिक UPI आयडी किंवा वैयक्तिक खात्यावर पैसे पाठविणे टाळा.

✻ प्रत्येक व्यवहाराची पावती जतन करा.

✻ व्यवहारानंतर अधिकृत पावती आणि कराराची प्रत मागा.

✻ कोणतीही रक्कम भरल्यानंतर त्याचा लेखी पुरावा अवश्य ठेवा.




**✻ QR Code स्कॅन करण्यापूर्वी दोनदा विचार करा**

सायबर गुन्हेगार आता बनावट QR Code वापरूनही आर्थिक फसवणूक करत आहेत.

अनेक वेळा बुकिंग कन्फर्म करण्यासाठी हा QR Code स्कॅन करा असा संदेश पाठवला जातो. प्रत्यक्षात पैसे मिळण्याऐवजी तुमच्या खात्यातून पैसे वजा होऊ शकतात.

लक्षात ठेवा–

QR Code स्कॅन करून पैसे मिळत नाहीत; बहुतांश वेळा पैसे जातात.

त्यामुळे QR Code वापरण्यापूर्वी त्याचा स्रोत आणि उद्देश निश्चित करा.

**✻ व्हॉट्स ॲपवरील प्रत्येक दस्तऐवज अधिकृत नसतो.**

आज अनेक व्यवहार व्हॉट्स ॲपवर सुरू होतात. परंतु PDF किंवा फोटो पाठविला म्हणजे तो अधिकृत दस्तऐवज आहे, असे समजू नये.

खालील बाबींची खात्री करा–

✻ दस्तऐवजावर कंपनीचे अधिकृत लेटरहेड आहे का?

✻ अधिकृत ई–मेलवरून त्याची प्रत मिळाली आहे का?

✻ दस्तऐवजावर आवश्यक स्वाक्षऱ्या आणि तपशील आहेत का?

✻ त्यातील माहिती अधिकृत नोंदींशी जुळते का?

**✻ Google Maps फक्त रस्ता दाखवत नाही; परिसरही सांगतो**

घर खरेदी करताना फक्त फ्लॅट पाहणे पुरेसे नसते. परिसराचा अभ्यासही तितकाच महत्त्वाचा असतो.

Google Maps **किंवा तत्सम सेवांद्वारे पुढील बाबी तपासता येतात–**

✻ कार्यालयापर्यंतचा प्रत्यक्ष प्रवास वेळ

✻ शाळा, रुग्णालये आणि सार्वजनिक वाहतूक

✻ वाहतुकीची गर्दी

✻ परिसरातील औद्योगिक किंवा प्रदूषण करणारे प्रकल्प

✻ पूरप्रवण किंवा पाणी साचणारे भाग

अनेकदा घर चांगले असते; पण परिसरातील समस्या भविष्यात मोठा त्रास निर्माण करू शकतात.

**✻ ऑनलाइन पुनरावलोकने** (Reviews) **वाचताना सावध राहा**

पाचतारांकित (✻✻✻✻✻) पुनरावलोकने पाहून अनेकजण प्रभावित होतात. मात्र सर्वच अभिप्राय खरे असतात असे नाही.

पुनरावलोकने वाचताना पुढील बाबी लक्षात घ्या–

✻ खूपच अतिशयोक्तीपूर्ण स्तुती आहे का?

✻ सर्व अभिप्राय एकाच कालावधीत टाकले आहेत का?

✻ नकारात्मक प्रतिक्रिया कशा प्रकारे दिल्या आहेत?

✻ त्यात प्रत्यक्ष अनुभवाचे तपशील आहेत का?

विविध स्रोतांमधील माहितीची तुलना केल्यास अधिक वास्तव चित्र समोर येते.

**✻ सायबर फसवणूक झाल्यास वेळ वाया घालवू नका**

जर चुकीच्या खात्यावर पैसे गेले किंवा ऑनलाइन फसवणूक झाल्याचा संशय आला तर त्वरित पुढील पावले उचला–

✻ संबंधित बँकेला तातडीने कळवा.

✻ व्यवहाराची माहिती सुरक्षित ठेवा.

✻ स्क्रीनशॉट, संदेश, व्यवहार क्रमांक जतन करा.

✻ सायबर गुन्ह्याची अधिकृत तक्रार त्वरित नोंदवा.

✻ विलंब केल्यास रक्कम परत मिळण्याची शक्यता कमी होऊ शकते.

**✻ भावनिक निर्णयाऐवजी माहितीपूर्ण निर्णय घ्या**

हे घर उद्यापर्यंतच उपलब्ध आहे, आत्ताच निर्णय घ्या, शेवटची संधी अशा वाक्यांमुळे अनेकजण घाईत निर्णय घेतात.

**लक्षात ठेवा–**

घर खरेदी हा आयुष्यातील सर्वात मोठ्या आर्थिक निर्णयांपैकी एक आहे. त्यामुळे निर्णय घाईने नव्हे, तर पडताळणीनंतरच घ्या.

**क्रमशः... (भाग – ३)**

पुढील भागात आपण पाहणार आहोत–

✻ प्रथमच घर खरेदी करणाऱ्यांनी कोणत्या चुका टाळाव्यात?

✻ ज्येष्ठ नागरिक आणि NRI खरेदीदारांसाठी विशेष सूचना.

✻ बिल्डर, ब्रोकर आणि खरेदीदार यांच्या जबाबदाऱ्या.

✻ सुरक्षित घरखरेदीचे १० सुवर्ण नियम.

✻ प्रभावी निष्कर्ष आणि वाचकांसाठी कृती आराखडा.

**– इंजि. प्रकाश जैन**
**सिव्हिल इंजिनिअर,** RERA **व**
Re-Development Consultant
**१९९० पासून बिल्डर व डेव्हलपर म्हणून कार्यरत.**
**रिअल इस्टेट,** RERA **आणि पुनर्विकास क्षेत्रातील ३० + वर्षांचा अनुभव.**

**आदर्श कन्सल्टन्सी**
O-1, **आदर्श समृद्धी अपार्टमेंट, चौपाटी कारंजा, अहिल्यानगर.**
**मो.:९४२२२२०७६२ / ८९७५११२३४५**



AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांमध्ये स्वीकृत सदस्यपदी माजी सैनिकांना संधी देण्याची ग्रामविकास सचिवांकडे मागणी

नगर – महाराष्ट्रातील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांमध्ये निवडणुकांनंतर नियुक्त करण्यात येणाऱ्या स्वीकृत सदस्यपदावर माजी सैनिकांना प्रतिनिधित्व देण्यात यावे. प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्ये किमान एक स्वीकृत सदस्य म्हणून माजी सैनिकाची नियुक्ती करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने शिवाजी पालवे यांनी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास सचिवांकडे करण्यात केली आहे.

जय हिंद फाऊंडेशनने राज्य शासनाला या मागणीचा सकारात्मक विचार करून प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्ये किमान एक स्वीकृत सदस्य म्हणून माजी सैनिकाची नियुक्ती करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती केली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये माजी सैनिकांचा सहभाग वाढल्यास विकासकामांमध्ये पारदर्शकता, शिस्त आणि जनहिताला अधिक प्राधान्य मिळेल, असा विश्वासही फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

याबाबत पालवे म्हणाले, देशाच्या संरक्षणासाठी आयुष्याचा महत्त्वाचा काळ सीमारेषेवर घालविणाऱ्या माजी सैनिकांचा अनुभव, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रहिताची भावना ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे त्यांना स्थानिक प्रशासनात योगदान देण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात लवकरच ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार असून, निवडणुका पार पडल्यानंतर विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाते. या नियुक्ती प्रक्रियेत देशसेवेसाठी कार्य केलेल्या माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी जय हिंद फाऊंडेशनने केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजी सैनिक हे शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि पारदर्शक कामकाजासाठी ओळखले जातात. समाजहिताला प्राधान्य देण्याची त्यांची भूमिका आणि प्रशासनाचा अनुभव स्थानिक विकासाला गती देणारा ठरू शकतो. ग्रामविकास, सामाजिक सलोखा, सार्वजनिक शिस्त आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरू शकते.

# फुफ्फुस व श्वसनमार्ग आजारावरील उपचारांसाठी अत्याधुनिक फ्लेक्झिबल ब्रॉन्कोस्कोपी युनिटचे नोबल हॉस्पिटलमध्ये उद्‌घाटन

नगर – नगर जिल्ह्यातील आरोग्यसेवेला नवे तंत्रज्ञान उपलब्ध करून देत एशियन नोबल हॉस्पिटलने गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर अत्याधुनिक फ्लेक्झिबल ब्रॉन्कोस्कोपी युनिट सुरू केले आहे. या सुविधेमुळे फुफ्फुस व श्वसनमार्गाशी संबंधित गुंतागुंतीच्या आजारांचे अचूक निदान आणि उपचार आता अहिल्यानगरमध्येच शक्य होणार असून, रुग्णांना यासाठी पुणे किंवा अन्य ठिकाणी जाण्याची आवश्यकता राहणार नाही.



एशियन नोबल हॉस्पिटल येथे अत्याधुनिक फ्लेक्झिबल ब्रॉन्कोस्कोपी युनिटचे उद्घाटन जखणगावचे सरपंच डॉ. सुनील गंधे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. बापूसाहेब कांडेकर यांच्यासह नोबल हॉस्पिटल परिवारातील डॉक्टर्स उपस्थित होते. (छाया : समीर मन्यार)

या अत्याधुनिक विभागाचे उद्घाटन आरोग्यग्राम जखणगावचे लोकनियुक्त सरपंच तथा ज्येष्ठ फॅमिली फिजिशियन डॉ. सुनील गंधे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नोबल हॉस्पिटलचे संचालक डॉ. बापूसाहेब कांडेकर यांच्यासह हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. बापूसाहेब कांडेकर म्हणाले की, एशियन नोबल हॉस्पिटल हे गेल्या २५ वर्षांपासून हृदयरोगासह विविध वैद्यकीय शाखांमध्ये अत्याधुनिक सेवा देणारे जिल्ह्यातील अग्रगण्य मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आहे. आता अत्याधुनिक ब्रॉन्कोस्कोपी युनिट सुरू झाल्याने हॉस्पिटलमधील सर्व वैद्यकीय शाखा अधिक सक्षम व परिपूर्ण झाल्या आहेत.

नोबल हॉस्पिटलमध्ये नुकतेच पूर्णवेळ रुजू झालेले फुफ्फुसरोगतज्ज्ञ व इन्टेन्सिव्हिस्ट डॉ. सुयश गंधे यांनी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक व सह्याद्री हॉस्पिटल येथे विशेष प्रशिक्षण घेतले असून, आयडीसीसीएम या अत्याधुनिक क्रिटिकल केअर अभ्यासक्रमात विशेष प्राविण्य मिळविले आहे. त्यांच्या अनुभवामुळे अतिदक्षता विभागातील गंभीर रुग्णांच्या उपचारांचा दर्जा अधिक उंचावेल आणि रुग्णांचा सर्व्हायव्हल रेट वाढण्यास निश्चित मदत होईल, असा विश्वास डॉ. कांडेकर यांनी व्यक्त केला.याचबरोबर थोरॅकोस्कोपी ही आधुनिक सुविधा देखील लवकरच नोबल हॉस्पिटल मध्ये सुरू करण्यात येणार असल्याचे डॉ. कांडेकर यांनी सांगितले या तंत्रज्ञानाद्वारे फुफ्फुसाभोवतालच्या छातीच्या पोकळीची दुर्बिणीद्वारे तपासणी करून विविध आजारांचे अचूक निदान करणे शक्य होणार असल्याचे ते म्हणाले.

फुफ्फुस रोग तज्ञ डॉ. सुयश गंधे यांनी सांगितले की, ब्रॉन्कोस्कोपी या तंत्रज्ञानाद्वारे नाक किंवा तोंडातून लवचिक कॅमेऱ्याची नळी श्वासनलिकेत व फुफ्फुसांपर्यंत पोहोचवून तपासणी केली जाते. सततचा खोकला, रक्ताची थुंकी, फुफ्फुसातील गाठी, कॅन्सर, संसर्ग, क्षयरोगाचा संशय, श्वासनलिकेतील अडथळे तसेच लहान मुले किंवा प्रौढांच्या श्वासनलिकेत अडकलेल्या परकीय वस्तू शस्त्रक्रियेशिवाय काढणे यासाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरते.

उद्घाटन प्रसंगी नोबल हॉस्पिटलच्या डायरेक्टर डॉ. संगीता कांडेकर, विजय निकम, डॉ. संयोगिता गंधे, डॉ. आशिषकुमार चौधरी, राहुल हिरे, डॉ. विनय हिरे, व्यवस्थापक डॉ. विश्वजीत मोरे, डॉ. नितीन साळुंखे, डॉ. महेश चौरे, संदीप वाघमोडे, अविनाश चांदणे, डॉ. नेहा भूमकर यांच्यासह नोबल हॉस्पिटल परिवारातील डॉक्टर्स व कर्मचारी उपस्थित होते.

# सद्‌गुरू विठ्ठलबाबांच्या पादुका पूजनाने इसळक येथे गुरुपौर्णिमा उत्साहात

नगर – श्री क्षेत्र रामनगरी इसळक–निंबळक येथील वैष्णवदेवी संस्थान, सद्गुरू विठ्ठलबाबा देशमुख मंदिराच्या प्रांगणात चैतन्यमयी गुरुपौर्णिमा उत्सव व पादुका पूजन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यास पंचक्रोशीसह दूरवरून आलेल्या भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सद्गुरू विठ्ठलबाबांच्या चरणी श्रद्धा अर्पण केली.



ईसळक येथे सद्‌गुरू विठ्ठलबाबांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले.

गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळी खारेकर्जुने गावातून सद्गुरू विठ्ठलबाबा देशमुख यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पताका, टाळ–मृदुंगाचा गजर, अभंग आणि हरिनामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. मिरवणुकीदरम्यान वारकरी व भाविकांनी पाऊली, फुगडी तसेच विविध भक्तिगीतांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यामुळे खारेकर्जुने गावातील वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.

त्यानंतर श्री क्षेत्र रामनगरी ईसळक येथील सद्गुरू विठ्ठलबाबा देशमुख मंदिराच्या प्रांगणात मुख्य कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे यजमान डॉ. कु. सायली बाळासाहेब निमसे यांच्या वतीने त्यांच्या आई–वडिलांच्या हस्ते होमहवन करण्यात आले. प्रा. बाळासाहेब निमसे व सौ. भारती निमसे यांच्या हस्ते सद्गुरू विठ्ठलबाबांच्या पादुकांचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांनी सद्गुरूंच्या पादुकांचे दर्शन घेत आशीर्वाद प्राप्त केला.

यानंतर ह.भ.प. गुरुदास श्रीनिवास महाराज घुगे यांनी आपल्या सुश्राव्य कीर्तनातून सद्गुरूंचा महिमा विशद केला. त्यांच्या रसाळ वाणीतील कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. प्रवचन व कीर्तनाच्या माध्यमातून गुरू–शिष्य परंपरेचे महत्त्व, सद्गुरूंचे जीवनातील स्थान आणि भक्तीमार्गाचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात कथक च्या परंपरेनेबहारदार नृत्य प्रस्तुती केलेल्या नृत्यझंकार च्या विद्यार्निनी व संचालिका नृत्यगुरू प्रिया ओगले–जोशी.

# नृत्यरंगात रंगला 'नृत्यझंकार'चा गुरुपौर्णिमा सोहळा

नगर – गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून नृत्यझंकार नृत्यवर्गाच्या विद्यार्थिनींनी गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रम सोहळा अतिशय रंगतदार असा सादर केला.

प्रस्तावना मानसी कुलकर्णी यांनी केली. कथक नृत्याची माहिती शितल शेळके यांनी दिली. नृत्यझंकार च्या संचालिका प्रिया ओगले–जोशी, सुहास ढोरजे, आशिष खरात यांनी नटराज पूजन ,घुंगरू पूजन, संगीत वाद्य, गुरूपूजन पूजन केले. प्रिया ताईंनी कथकनृत्यांची, नटराज शिवचितम्बर यांची माहिती सांगत गुरूंची विषयी आदर व अनुभव सांगितले.सर्व विश्वच नृत्यमय, तालमय आहे याचे उदाहरण दिले. खुशबू मेश्राम व शितल शेळके यांनी त्यांच्याकडून त्याची गुरुपौर्णिमेचे महत्त्व, गुरुबदल मनोगत सर्वांना सांगितले.

गणपती श्लोक, ताल त्रितालाच्या विलंबित, मध्य व दृत लयीत नृत्य प्रस्तुती करण्यात आली. हार्मोनियम वादक सुहास ढोरजे व तबला वादक आशिष खरात यांनी साथसांगत केली. नृत्यझंकारच्या संचालिका प्रिया ओगले–जोशी यांचा सर्व विद्यार्थ्यांनी प्रेमाने व आदराने सत्कार केला. परिक्षेत उल्लेखनीय यश मिळवल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सर्व विद्यार्थिनींना गौरवण्यात आले. उपस्थित श्रोत्यांनी अतिशय भक्तिमय नृत्यमय अशा सोहळ्या समाधान मिळाले अशी प्रतिक्रिया पोहोच पावतीच दिली. तेजस्विनी येनगंदुल हिने आभार मानले.

# अनाहत एक कलासृष्टी आयोजित अभंगनाद कार्यक्रमास प्रतिसाद

नगर – या वर्षीची आषाढी एकादशी नगरकरांसाठी खास पर्वणी देणारी ठरली. ओम् नमोजी आद्या, विश्वाचे आर्त, राजस सुकुमार, विष्णुमय जग, निर्गुणाचे भेटी, कानडा वो विठ्ठलू, खेळ मांडियेला, सगुण संपन्न, संत भार पंढरीत, पद्मनाभा नारायणा, हरी म्हणा, अवघे गरजे पंढरपूर, कानडा राजा पंढरीचा, अबीर गुलाल अश्या एकाहुन एक सरस अभंग सादरीकरणाने अहिल्यानगरकर रसिक विठ्ठल भक्तीरसात न्हाऊन निघाले.



अनाहत एक कलासृष्टी, आयोजित अभंगनाद कार्यक्रमात भक्तिगीते सादर करताना कलाकार.

अनाहत एक कलासृष्टी, अहिल्यानगर आयोजित आणि संवाद पब्लिसिटी प्रस्तुत अभंगनाद हा कार्यक्रम आषाढी एकादशी निमित्त माऊली सभागृह येथे रसिकांच्या उदंड प्रतिसादात पार पडला.

ऐ.पी. इन्कॉर्प, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, चंदुकाका सराफ, यांच्या सहकार्याने सादर झालेल्या कार्यक्रमात गायक कलाकार – सौ. अनुजा कुलकर्णी, अभिजीत आपस्तंभ, ओंकार देऊळगावकर, सौ.अमृता बेडेकर, सौ. श्रेया सुवर्णपाठकी, तसेच वादक कलाकार – प्रसाद सुवर्णपाठकी, आनंद कुलकर्णी, सौरभ साठे, संकेत सुवर्णपाठकी, चि. शार्दूल खोल्लम या सर्व अहिल्यानगरच्या कलाकारांनी सादर केलेल्या अभंगात रसिक मंत्रमुग्ध झाले. कु. वैष्णवी कुलकर्णी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले अभंगनृत्य विशेष आकर्षण ठरले. या कार्यक्रमाची संकल्पना, दिग्दर्शन व निरूपण या तिहेरी भूमिका प्रा. प्रसाद बेडेकर यांनी सांभाळल्या. प्रकाश योजना बंटी ढोरे व सोहम सौंदणकर यांची तर ध्वनी व्यवस्था अवधूत गुरव यांची होती.अनाहत एक कलासृष्टी यांच्या वतीने गेल्या वर्षीपासून आषाढी एकादशीच्या निमित्ताने विशेष संगीत मैफल आयोजित करण्यात येते. यंदाही अभंगानाद या कार्यक्रमाच्या निमित्ताने विठ्ठल भक्तीचा सांगीतिक आस्वाद नगरकरांसाठी सादर करण्यात आला. या वेळी पायी पंढरपूर वारी करून आलेले माऊली सभागृहाचे दिनकर घोडके आणि पी.डी.कुलकर्णी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष खोल्लम, मोहिनी खोल्लम, अमित डोंगरे, महेश कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, कृष्णा बेलेकर, गीतांजली सगम, गायत्री धनलगडे, अक्षय ताठे, योगेश पंडित यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास रौनक पोखरणा, पराग नेवारे, श्री. बहिरट, विलास बडवे, अशोक गांधी, पवन नाईक, दिनकर घोडके, पी. डी. कुलकर्णी, किशोर कुलकर्णी, भूषण भणगे, नितीन थाडे,चंद्रकांत पंडित, सुदाम देशमुख, अविनाश देऊळगावकर, अविनाश कुलकर्णी, अतुल खिस्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

# सिस्पे प्रकरणात दुबईपासून दिल्लीपर्यंत केला सातत्याने पाठपुरावा

## पाठपुराव्यावरून श्रेयवाद; खा. नीलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत मांडली भूमिका

नगर – जिल्ह्यातील बहुचर्चित सिस्पे आर्थिक घोटाळ्यातील मुख्य आरोपी राहुल शामराव काळोखे याच्या अटकेमागे आपण आणि आपल्या सहकाऱ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचा दावा खासदार नीलेश लंके यांनी केला.

दिल्ली येथे महाराष्ट्र भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना लंके यांनी सांगितले की, सिस्पे घोटाळा उघडकीस आल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संबंधित प्रशासकीय यंत्रणा तसेच पोलीस अधिकाऱ्यांकडेही पाठपुरावा करण्यात आला.

सप्टेंबर २०२५ मध्ये आरोपी दुबईमध्ये असल्याची माहिती मिळाल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांची टीम तेथे पाठवून आरोपींचे वास्तव्य, व्यवसाय, ट्रेड लायसन्स, बँक खात्यांशी संबंधित माहिती, एमिरेट आयडी आणि अन्य कागदपत्रे संकलित करण्यात आली. ही माहिती तत्कालीन पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत पुढील तपासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.



दिल्ली येथे महाराष्ट्र भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना खासदार नीलेश लंके.

९ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन आरोपींविरोधात इंटरपोलमार्फत कारवाई तसेच केंद्रीय तपास यंत्रणांकडून चौकशी करण्याची मागणी केल्याचेही लंके यांनी सांगितले. त्यानंतर गृहमंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय आणि संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला.

इंटरपोलची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर राहुल काळोखे याने दुबईहून बहरीन आणि नंतर फिजी येथे आश्रय घेतल्याची माहिती मिळाली. विविध यंत्रणांमधील समन्वयानंतर त्याला अटक करण्यात आल्याचा दावा लंके यांनी केला. पत्रकार परिषदेत लंके यांनी आरोपींच्या कंपन्यांचे ट्रेड लायसन्स, व्यवसाय परवाने, बँक खात्यांशी संबंधित माहिती, वास्तव्याचे पुरावे आणि अन्य दस्तऐवज आपल्या ताब्यात असून, योग्य वेळी ते सार्वजनिक करण्यात येतील, असे सांगितले.

सिस्पे घोटाळ्याच्या पाठपुराव्याचे श्रेय इतर लोकप्रतिनिधींकडून घेतले जात असल्याबाबत विचारले असता, सार्वजनिक वक्तव्ये आणि प्रत्यक्ष काम यात फरक असतो. श्रेयवादात अडकण्यापेक्षा फरार आरोपींना अटक करणे आणि पीडितांना न्याय मिळवून देणे अधिक महत्त्वाचे आहे, असे लंके यांनी नमूद केले.

तसेच, आरोपींना अटक होणे ही प्रक्रियेची सुरुवात असून, अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि अन्य यंत्रणांनी आरोपींच्या मालमत्ता व आर्थिक व्यवहारांचा शोध घेऊन आवश्यक कायदेशीर कारवाई करावी. जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तांमधून गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी मागणीही त्यांनी केली.



### गुरुवाणी – ६
### 'अहिंसा' आणि 'संयम'

मूर्तीकार असेल तरच दगडातून मूर्ती साकारते. देवतांना गुरूची आवश्यकता नसते. पण मनुष्य हा असा प्राणी आहे जो जन्माला येतो ते कर्म केल्याने. पण त्याचे जीवन बनते बनवणाऱ्यामुळे. आयुष्यातील ९ तत्वांपैकी 'आश्रव' तत्व खूप महत्त्वाचे आहे. आश्रव म्हणजे 'इनकमिंग'. खिडकी उघडी ठेवली तर हवा, उजेड आपोआप आत येतो. काही जण दरवाजे, खिडक्या बंद ठेवतात. पण कोणीतरी बाहेरून येऊन बळजबरीने दरवाजे उघडतो आणि ईश्वर आत प्रवेश करतो. अनेक लोकांची इच्छा नसतानाही त्यांचे दरवाजे उघडले जातात, कारण परिस्थिती तशी निर्माण होते. भगवान महावीर आणि रोहिणेय चोराची प्रसिद्ध कथा आहे. चोराचा पिता मरताना सांगतो की महावीर प्रभूंची वाणी ऐकू नकोस, कारण त्यांची वाणी ऐकल्यास चोरी सुटते. पण परिस्थिती अशी निर्माण होते की चोरी करून पळून जाताना रोहिणेय चोराच्या कानावर भगवान महावीरांची वाणी पडते. देवतांविषयीचे चार वाक्ये त्याच्या कानावर पडले. या दरम्यान चोर पकडला जातो. अभयकुमार त्याची चौकशी करतो. त्याचे सत्य जाणून घेण्यासाठी त्याला दारू पाजतो, अप्सरांना त्याच्यासमोर आणतो. त्याला आमिष दाखवले जाते. पण चोराला भगवान महावीरांचा उपदेश आठवतो. तो अभयकुमारचा खेळ बिघडवतो. रोहिणेय चोराने विचार केला, इच्छा नसताना मी भगवान महावीरांचे चार वाक्ये ऐकले आणि संकटातून बाहेर पडलो. त्याने भगवान महावीरांच्या चरणी पूर्ण समर्पण केले. त्याचप्रमाणे 'आनंदगाथा' इच्छा नसताना ऐकली तरी जीवनात सकारात्मक परिवर्तन नक्की होते. यालाच आश्रव म्हणतात. सध्या जगात चुकीच्या संस्कृतीमुळे बरबादी होत आहे. स्वैराचार वाढला आहे. जगाला वाचवण्यासाठी भगवान महावीरांच्या 'अहिंसा' आणि 'संयम' या शिकवणुकीची गरज आहे. गुरूदेवांचे जीवन म्हणजे असेच नवीन इतिहास निर्माण करणारे होते . त्यांनी समाज परिवर्तन केले. त्यामुळे आनंदगाथा खूप महत्वपूर्ण आहे. याच आनंदगाथेचे आश्रव सगळ्यांना करायचे आहे. आपण जे ग्रहण करतो त्यानुसार आपले जीवन घडते.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# 'आज की शाम रफी के नाम' संगीत कार्यक्रमाचे २ ऑगस्ट रोजी आयोजन

नगर – हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर गायक मोहम्मद रफी यांच्या ३५ व्या स्मृतिदिनानिमित्त आज की शाम रफी के नाम हा विशेष संगीतमय कार्यक्रम २ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता सर्जेपुरा येथील रहमत सुलतान हॉल येथे रंगणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्रसिद्ध गायक व रफी प्रेमी सईद खान यांनी आयोजित केले असून, रफी यांच्या अजरामर गीतांचा सुरेल प्रवास रसिकांना अनुभवता येणार आहे.



या मैफलीत विद्या तन्वर, अंजुम पटवेकर, आबीद हुसेन, अन्वर शेख, प्रशांत छजलानी, अनसार शेख, मुख्तार शेख, संजय भिंगारदिवे व सईद खान हे गायक–गायिका मोहम्मद रफी यांच्या गाजलेल्या गीतांना आपल्या स्वरांतून सादर करणार आहेत. विविध भावछटांनी नटलेली प्रेमगीत, भक्तिगीत, गझल आणि देशभक्तीपर गीतांचा सुरेल आविष्कार या कार्यक्रमात अनुभवायला मिळणार आहे.

रफी यांच्या सुवर्णकाळातील संगीताला उजाळा देत जुन्या हिंदी गीतांचा आनंद घेण्याची ही रसिकांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. संगीतप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून रफी यांच्या सुरेल आठवणींना उजाळा द्यावा, असे आवाहन आयोजक सईद खान यांनी केले आहे.

# सावेडीतील शिंदे मळा येथे अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

नगर – संत नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त सावेडीतील शिंदे मळा येथे ३ ते १० ऑगस्टदरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

३ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजता बाबासाहेब गोलांडे (वाकोडीकर), ४ ऑगस्ट रोजी तुळशीराम महाराज लबडे (अहिल्यानगर), ५ ऑगस्ट रोजी कपिल महाराज माळवदे (अहिल्यानगर), ६ ऑगस्ट रोजी निवृत्ती महाराज नामदास (नामदेव महाराज यांचे १७ वे वंशज, पंढरपूर), ७ ऑगस्ट रोजी विठ्ठल महाराज वाघ (उजनी पिंपळगाव), ८ रोजी वर्षाताई काळे / कोकाटे (झी टॉकीज फेम, बीड), ९ ऑगस्ट रोजी ओंकार म हाराज जोंजाळ (इंदापूर) ९ रोजी दुपारी ४.३० वाजता दिंडी मिरवणुकीस प्रारंभ होईल. त्यानंतर दीपप्रज्वलन, पारायण सांगता तसेच १० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता नवनाथ महाराज शास्त्री (मच्छिंद्रनाथ देवस्थान, भालगाव) यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष अशोक वडे यांनी दिली.

तसेच यावेळी विविध भजनी मंडळांचे दुपारी ३ ते ५ या वेळेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये नित्य हरिपाठ श्री नामदेव भजनी मंडळ शिंदे मळा, राधे राधे भजनी मंडळ, पाईपलाईन रोड, दुर्गा भजनी मंडळ बालिकाश्रम रोड, संस्कृती भजनी मंडळ बागडे मळा, श्री ज्ञानमाऊली भजनी मंडळ श्रीराम चौक, श्री संत नामदेव भजनी मंडळ शिंदे मळा, ओम संगीत विद्यालय राजेंद्र मल्हार, विद्यार्थी तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे व्यासपीठ नेतृत्व पेहेरे आणि राजू पाटकुले हे करणार आहे.

तसेच सकाळी काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, महिला भजनी मंडळाचे भजन, हरिपाठ आणि रात्री हरिकीर्तन असे दिवसभर सप्ताह काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे.

सप्ताह यशस्वी करण्यासाठी नामदेव शिंपी समाज ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वडे, उपाध्यक्ष विजय काकडे, सचिव राजेंद्र बगाडे, सहसचिव सुधीर नेवासकर, खजिनदार कृष्णा भस्मे आदी प्रयत्नशील आहेत.

# प्रा. सविता झरेकर-देशमुख यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी.

## सलग चार वर्षांच्या अथक संशोधनाला यश

नगर – न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या प्राध्यापिका डॉ. सविता भाऊसाहेब झरेकर – देशमुख यांनी पुणे विद्यापीठाची प्रतिष्ठेची पीएच.डी. पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे. कॉमर्स विषयात त्यांनी संशोधन मार्गदर्शक डॉ. मंगेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सलग चार वर्षे अभ्यासपूर्ण संशोधन करून आपला प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण केला.

२९ जुलै रोजी झालेल्या अंतिम ऑनलाइन तोंडी सादरीकरणानंतर चेअरमन डॉ. धीरज झाल्टे (नाशिक) तसेच बाह्य परीक्षक डॉ. सोनल काळे (मुंबई) यांच्या उपस्थितीत झालेल्या परीक्षेत त्यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर करण्यात आली.



न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या प्राध्यापिका डॉ. सविता भाऊसाहेब झरेकर–देशमुख यांनी पुणे विद्यापीठाची प्रतिष्ठेची पीएच.डी. पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे.

डॉ. सविता झरेकर – देशमुख या गेली बारा वर्षे न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेत अध्यापनाचे कार्य करत आहेत. अध्यापनाबरोबरच संशोधनाची आवड जोपासत त्यांनी सातत्य, जिद्द आणि परिश्रम यांच्या बळावर डॉक्टरेट पदवी संपादन केली. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयासह संपूर्ण अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढला आहे.


या संशोधन कार्यासाठी न्यू आर्ट्स महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब सागडे, कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य विभाग, बीबीए विभाग तसेच संशोधन मार्गदर्शक डॉ. मंगेश वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. सविता झरेकर– देशमुख या नगर महापालिकेचे माजी उपायुक्त नाना उर्फ रामकिसन देशमुख यांच्या स्नुषा आहेत शालिनी वाबळे व माजी नौदल कर्मचारी मनसुख वाबळे याची ती भाची आहे.

याप्रसंगी मनसुख वाबळे, शालिनी वाबळे व समस्त वाबळे परिवार यांच्या वतीने डॉ. सविता झरेकर –देशमुख यांचे अभिनंदन करण्यात आले.

# चास येथील आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये इंजीनियरिंग, एमबीए आणि एमसीए प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची प्रथम पसंती

नगर – नगर तालुक्यातील चास येथील अभियांत्रिकी शिक्षणात अग्रेसर असलेल्या साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेच्या आडसूळ टेक्निकल कॅम्पसला प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरताना प्रथम पसंतीक्रम मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेता संस्थेने अभियांत्रिकीसाठी सिव्हिल, कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलीकम्युनिकेशन व मेकॅनिकल इंजिनिअरिंग इत्यादी कोर्सबरोबरच मागील काही वर्षापासून इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या दोन शाखांचाही अभियांत्रिकी पदवीसाठी समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या पसंतीची अभियांत्रिकीची शाखा निवडणे सोयीस्कर झाले आहे. पदव्युत्तर शिक्षणासाठी एम. ई., एम.सी.ए. आणि एमबीए हे पर्याय आता कॅम्पसमध्ये उपलब्ध आहेत.



आडसूळ टेक्निकल कॅम्पसच्या शैक्षणिक धोरणानुसार ग्रामीण विद्यार्थी हा गुणवत्तापूर्ण व कौशल्याधिष्ठित अभियंता घडला पाहिजे यासाठी महाविद्यालयामध्ये उच्च विद्याविभूषित व अनुभवी प्राध्यापक, शैक्षणिक वेळापत्रकाची काटेकोर अंमलबजावणी, नियमित होणाऱ्या थेअरी व प्रात्यक्षिक तासीकामुळे विद्यार्थ्यांची वाढलेली उपस्थिती, सराव परीक्षा, वर्षभर आयोजित केलेल्या क्षेत्रभेटी, तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर आयोजित केलेले व्याख्याने, व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रम, उद्योजकता विकास कार्यक्रम अशा विविध उपाय योजनांचा अवलंब आडसूळ टेक्निकल कॅम्पस कडून करण्यात येत आहे. सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत इलेक्ट्रिकल व्हेकल टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स ऍटोमेशन, इंटरनेट ऑफ थिंग्स, ३ डी प्रिंटिंग आणि इंडस्ट्री ४ सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण याचा परिणाम म्हणून विविध शाखांच्या विद्यार्थ्यांनी विविध ब्रांचेस मधून आपल्या तांत्रिक कौशल्याचा ठसा उमटवत कॅम्पस मुलाखतीच्या माध्यमातून ८.५ ते २२ लाखापर्यंत वार्षिक पॅकेज मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धतीमुळे आडसूळ टेक्निकल कॅम्पसला प्रतिष्ठेची समजली जाणारी नॅक व एन.बी.ए. ही यू.जी.सी. कडून दिली जाणारी नामांकने अल्पावधीत प्राप्त करण्यात यश मिळवले.संस्थेची वाढती प्रतिष्ठा गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण पद्धतीमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आडसूळ टेक्निकल कॅम्पसला बेस्ट कॅम्पस, महाराष्ट्रातील सर्वोत्तम एज्युकेशनल कॅम्पस पुरस्कार तसेच भारतातील प्रतिष्ठित महाविद्यालय पुरस्काराने सन्मानित केले.

ग्रामीण भागातून व राज्यातील विविध जिल्ह्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोईसाठी अल्प दरात मुला–मुलींसाठीचे वस्तीगृह उभारण्यात आले आहे. महाविद्यालयाने मिळवलेल्या विविध पुरस्कारामुळे आमची जबाबदारी वाढली असून पंचक्रोशीतील सर्वोत्कृष्ट शैक्षणिक संकुल बनवण्याचा आमचा मानस असल्याचे प्रतिपादन अडसूळ टेक्निकल कॅम्पसचे प्राचार्य व संचालक डॉ. पी. एम. पाटील यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ यांनी शैक्षणिक संकुलातील सर्व प्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक यांनी संस्थेचा नावलौकिक वाढवला असून त्यांच्या तन्मयतेने केलेल्या कार्याचा गौरव केला. याही वर्षी बहुसंख्य विद्यार्थी प्रवेशाकरता आडसूळ टेक्निकल कॅम्पसचा डी टी ई कोड ५३८० आणि ५६०७ हा पर्याय त्यांच्या यशस्वी भवितव्यासाठी निवडावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. प्रवेशा संदर्भातील सविस्तर माहिती संस्थेच्या प्रवेश कक्षात तसेच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ९४०६९७९७९७



डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल येथे नेत्ररोग विभागात अत्याधुनिक एएमटी उपचारपद्धतीचा शुभारंभ झाला.

# डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल कॉलेज येथे नेत्ररोग विभागात अत्याधुनिक एएमटी उपचारपद्धतीचा शुभारंभ

नगर – गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल अँड मेडिकल कॉलेज, अहिल्यानगर येथील नेत्ररोग विभागामध्ये रुग्णांसाठी म्निओटिक मेम्ब्रेन ट्रान्सप्लांट (एएमटी) ही अत्याधुनिक उपचारपद्धती सुरू करण्यात आली आहे.

नेत्ररोग विभागप्रमुख डॉ. अरुंधती पांडे यांनी पुढाकार घेऊन रुग्णांच्या हितासाठी हा उपक्रम यशस्वीपणे अंमलात आणला. या उपचारपद्धतीमुळे कॉर्नियावरील जखमा, अल्सर, रासायनिक भाजणे आणि नेत्रपटल तसेच इतर गंभीर नेत्रविकारांवरील उपचार अधिक प्रभावीपणे करता येणार असून रुग्णांना दर्जेदार व आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध झाली आहे. ही अत्याधुनिक सेवा डॉ. सुजय विखे पाटील व डॉ. अभिजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहे. तसेच ब्रिगेडियर डॉ. अरूण त्यागी, डॉ. देशपांडे, डॉ. सतीश मोरे आणि डॉ. प्रसाद काजळे यांच्या भक्कम पाठिंबा, मार्गदर्शन व सहकार्यामुळे ही सेवा यशस्वीपणे सुरू करणे शक्य झाले. या उपक्रमासाठी प्रसूती व स्त्रीरोग विभागाने सहकार्य केले. डॉ. उर्मिला गवळी व डॉ. सुहास शिंदे यांनी एएमटी साठी आवश्यक असलेल्या म्निओटिक मेम्ब्रेनचे संकलन करण्यामध्ये योगदान दिले.

नेत्ररोग विभागाने सुरू केलेल्या या अत्याधुनिक उपचारपद्धतीमुळे नगर परिसरातील रुग्णांना स्थानिक पातळीवरच जागतिक दर्जाची नेत्रसेवा उपलब्ध होणार आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये ५ ते २८ ऑगस्टदरम्यान मोफत महाआरोग्य तपासणी शिबीर

## अल्प दरात विविध तपासण्या व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जन्मजयंती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटर येथे ५ ते २८ ऑगस्ट या कालावधीत विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची मानवसेवेची शिकवण व प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी यांच्या प्रेरणेतून हे शिबिर घेण्यात येत आहे.

दररोज सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टर रूग्ण तपासणी करणार आहेत. दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचा लाभ असंख्य रूग्णांना झाला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल एन.ए.बी.एच. मान्यता प्राप्त असून ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेडस्चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमधील उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांचा लाभ या मोफत शिबिरांतून सर्वसामान्य रूग्णांना होणार आहे. हॉस्पिटलमध्ये विविध प्रकारच्या तपासण्या अल्प दरात उपलब्ध आहेत. तसेच शिबिरात सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिन कक्ष, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे.

या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला ५ ऑगस्ट रोजी सुरूवात होणार आहे. पहिल्या दिवशी सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पेंडिक्स व इंगवायनल हर्निया, हायड्रोसील इत्यादी शस्त्रक्रिया करण्यात येतील. ७ ऑगस्ट रोजी ब्लड प्रेशर, डायबिटीस, साथीचे आजार व सर्व रोग तपासणी व निदान शिबीर होईल. ८ ऑगस्ट रोजी दंतरोग तपासणी व उपचार शिबीर होणार आहे. यात दातांच्या नसावरील उपचार, मेटल कॅप, सिरॅमिक कॅप, रुट कॅनल, दातांची कवळी बसवणे, दात साफ करणे, दातात सिमेंट भरणे, दात काढणे आदी उपचार केले जातील. ९ ऑगस्ट रोजी हृदयरोग तपासणी व हृदय शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. यात ंजिओग्राफी तपासणी ३ हजार रुपयांत केली जाईल. हृदय शस्त्रक्रिया हृदयातील झडप बदलणे, छिद्रे बुजवणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व अँजिओप्लास्टी महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत केल्या जाणार आहेत.



१० ऑगस्ट रोजी दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे. यात लॅप्रोस्कोपीव्दारे पोटातील, बेंबी, हर्नियाची शस्त्रक्रिया, पित्ताशय काढणे, गर्भाशयाची पिशवी काढणे, स्टॅपलर लेझर पाईल्स शस्त्रक्रिया, अपेंडिक्स शस्त्रक्रिया, स्त्रीयांची कुटुंबनियोजन इत्यादी शस्त्रक्रिया केल्या जातील. ११ ऑगस्ट रोजी कान, नाक, घसा व स्पीच थेरपी तपासणी शिबीर होईल. हॉस्पिटल मध्ये ऑडिओमेट्री, स्पीच थेरपी सुविधा उपलब्ध आहे. १२ ऑगस्ट रोजी पोट विकार तपासणी शिबिर होईल. १३ ऑगस्ट रोजी मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे. डोकेदुखी, अपस्मार, पॅरालिसिस, कंबरदुखी, नसांचे विकार, स्नायूंचे विकार, मेंदूतील जंतुसंसर्ग, मेंदूज्वर, स्मृतीभ्रंश इत्यादी आजारांची तपासणी व उपचार केले जातील. मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे, ट्रॉमा सर्जरी, मेंदूतील रक्तस्त्राव, स्लिपडिक्स आदी समस्यांवर उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातील. १४ ऑगस्ट रोजी किडनी आजार तपासणी शिबिर होणार आहे. यात अंगावर सूज येणे, लघवी कमी अथवा लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, किडनी प्रत्यारोपण मार्गदर्शन, डायलेसिस रूग्ण तपासणी व मार्गदर्शन केले जाईल. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत डायलेसिस मोफत केले जाईल. १७ ऑगस्ट रोजी स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबीर होणार आहे. यात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी काढणे, सिझेरियन सवलतीच्या दरात होईल. शिबिरातील गर्भवती मातांना बाळंतपणावेळी होणार्या फीमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी बालरोग तपासणी शिबीर होणार आहे. यात लहान मुलं, नवजात शिशुंचे आजार आणि तपासणी, लहान मुलांच्या हर्निया, हायड्रोसील, फिमोसिस, ंडिसेंड टेस्टीस इत्यादी शस्त्रक्रिया केल्या जातील. २२ ऑगस्ट रोजी कॅन्सर तपासणी शिबीर होणार आहे. यात घसा, फुफ्फुस, आतडे, तोंडाचा इत्यादी कॅन्सर तपासणी, स्त्रियांचे कॅन्सर तपासणी, मॅमोग्राफी तपासणी १०० रूपयात करण्यात येईल. स्त्रियांच्या गर्भ पिशवीच्या कॅन्सरच्या तपासणीसाठी सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी केली जाणार आहे.

२३ ऑगस्ट रोजी नेत्ररोग तपासणी शिबीर होणार आहे. म हावीर भवन येथील आनंदऋषीजी नेत्रालय येथे होणाऱ्या या शिबिरात अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. नाव नोंदणीसाठी ८६८६४०१५१५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

२४ ऑगस्ट रोजी एंडो युरोलॉजीकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय), स्टोन तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे. प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरूष वंध्यत्व समुपदेशन, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन आदी उपचार केले जातील. रूग्णांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. २५ ऑगस्ट रोजी अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. इंपोर्टेड इम्प्लांटसह संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण केले जाईल. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनोंतर्गत पात्र लाभार्थींच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील.

शिबिरांची सांगता २८ ऑगस्ट रोजी प्लॅस्टिक सर्जरी शिबिराने होणार आहे. यात लहान मुलांच्या हाताच्या जन्मजात समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण, तोंड, गाल, ओठ, जीभ, जबडा, सायनस, लाळ ग्रंथीच्या गाठीचे निदान व उपचार मार्गदर्शन केले जाईल. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील.

या शिबिराची नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ०२४१–२३२०४७३/७४/७५ तसेच मो. ९४०४३९९९११ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे.

